# माणूस

साप्ताहिक

३१ डिसेंबर १९६६

चा ळी स पै से

# आम्ही

# विद्यार्थी

# आणि

# आमच्या

# दंगली

श्री. ब. मो. पुरंदरे

यांची एक ऐतिहासिक कादंबरी

# शिलंगणाचं सोनं



मूल्य तीन रुपये

राजहंस प्रकाशन पुणे

४१९, नारायण पेठ, पुणे २




## एक समग्र साप्ताहिक

वर्ष : सहावे
अंक : सव्वीसावा
किंमत : चाळीस पैसे
वार्षिक वर्गणी : वीस रुपये

**संपादक**

श्री. ग. माजगावकर

**संपादक मंडळ**

अ. मा. साधू
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

**व्यवस्था विभाग**

अ. वा. गंधे
अ. वि. गणपत्ये

पत्ता – ४९१ नारायण, पुणे २.
दूरध्वनी – ५७३५१

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

## पत्रमैत्री

स. न. १७ डिसें. ६६

'माणूस'च्या दिवाळी अंकापासून आज प्रकाशित झालेल्या 'माणूस'च्या अंकापर्यंत 'माणूस'च्या सर्वसामान्य वाचकांप्रमाणे मीही 'सांगत्ये ऐका' या आत्मचरित्रपर कथनाची प्रकरणे वाचायला फार फार उत्सुक राहत असे. चंदेरी दुनियेचे आकर्षणच और! त्यातही हंसाबाईंसारख्या एकेकाळच्या अत्यंत प्रसिद्ध कलावंताने स्वतःची आत्मकथा सांगितलेली. मी स्वतः कोणत्याही नटाचे किंवा नटीचे छायाचित्र दिवाणखान्यात लावत नाही, लावू देत नाही. त्यांच्या कलेची कदर करतो. पण त्या दुनियेतील कलावंतांचे विविध किस्से ऐकल्यावर साधी माणसं म्हणून तरी त्यांच्याबद्दल आदर बाळगावा की नाही, असा प्रश्नच उभा राहतो.

"शहाणे असाल, मुलीचं हित करायचं असेल तर या लाईनकडे तिला चुकूनही फिरकूसुद्धा देऊ नका," हे वाक्य आपल्या मुलींना या मयसृष्टीत धालू इच्छिणाऱ्या आई-वडिलांनी आपल्या अंतःकरणावर कोरून ठेवावं. हे वाक्य अतिशय प्रामाणिकपणे आपल्या कलाजीवनाचं सार काढताना सांगणाऱ्या हंसाबाईंचे अभिनंदन. मागच्या अंकात असं वाटलं होतं, की बाई वाहतच चालल्या. पण आज नवीन अंक वाचून वाटलं की, 'ती' मॅजिस्ट्रेटसंबंधीची हकीकत देणंही अपरिहार्य होतच.

इतर सदरेही फार मनोवेधक आहेत. 'वेंगालीन कृष्णन कृष्णमेनन' यांच्यावरील लेखही सुरेख होता.

**प्र. त्र्यं. चाफेकर, नागपूर.**

# परदेशी वकिलातीचे

भारतातील सध्याची राजवट येत्या सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ टिकणार नाही, असे भाकित येथील एका परदेशी वकिलातीने केल्यामुळे केंद्र सरकारच्या वरिष्ठ गोटात बरीच खळबळ माजली आहे. विशेषत:, प्रधानमंत्री इंदिरा गांधी आणि त्यांचे सहकारी यांच्या दरम्यान सध्या या भाकितासंबंधीच चर्चा चालू आहे. कारण गेल्या जानेवारीमध्ये इंदिराबाईंनी अधिकारस्वीकार केला, तेव्हा काँग्रेस पक्षामधल्या डाव्या व उजव्या अशा दोन्ही गटांनी त्यांना पाठिंबा दिला होता. परंतु गेल्या वर्षभरात त्यांच्या या लोकप्रियतेला ओहोटी लागलेली असून डावे आणि उजवे असे दोन्ही गट त्यांच्यापासून दूर गेले असून काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत आपण एकाकी पडत चाललो आहोत, याची त्यांना जाणीव झालेली आहे. त्यामुळे कदाचित आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी डावे आणि उजवे यांच्या परस्परांना छेद देण्याच्या संघर्षात प्रधानमंत्रिपद आपल्याकडे राहील अशी शक्यता त्यांना वाटत असली तरी ते टिकाऊ ठरणार नाही, अशी आशंका त्यांना वाटत आहे. परदेशी वकिलातीच्या 'त्या' भाकितामुळे इंदिरा गांधी यांच्या गोटात खळबळ निर्माण झाली आहे ती यामुळे. काँग्रेसमध्ये अंतर्गत गटबाजीस ऊत आला असला तरी सर्व राज्यांत तिच्या बहुमतास हादरा देण्याचे सामर्थ्य कोणत्याच पक्षात नाही ही गोष्ट उघड आहे. त्यामुळे केंद्रीय सरकारात काय किंवा राज्यांमध्ये काय काँग्रेस सत्तारूढ होणार याबद्दल कोणासच शंका वाटत नाही. हे बहुमत मिळाल्यानंतर सत्ता आपल्या हातात येत नाही, असे आढळून आल्यावर डावे आणि उजवे काँग्रेसवाले मध्यममार्गी इंदिराजींची राजवट चालू ठेवण्यास मंजुरी देतील. परंतु त्यांनी अधिकारसूत्रे स्वीकारल्यानंतर मात्र सत्तासंघर्षाचा लढा अधिक तीव्र होईल व तेव्हाच केंद्र सरकारमध्ये गंभीर पेचप्रसंग निर्माण होईल, अशी कारणमीमांसा या परदेशी वकिलातीने केली आहे.

हा झाला निवडणुकीनंतरच्या राजकारणाचा विचार. परंतु सध्याही इंदिरा

# ‘ते’ खळबळजनक भाकित !

गांधींची डोकेदुखी काही कमी नाही. नंदाजींच्या राजीनाम्यानंतर केंद्रीय मंत्रिमंडळात सुरू झालेली कुरबूर अद्यापही थांबलेली नाही. त्यातच पुरीच्या शंकराचार्यांचे व संत फत्तेसिंगांचे उपोषण. यामुळे परिस्थितीचा गुंता वाढला आहे. या दोन्ही उपोषणांच्या दडपणामुळे आपल्या धोरणात बदल करावयाचा नाही, असा निर्धार इंदिरा गांधी यांनी पुनःपुन्हा व्यक्त केला असला तरी त्यांच्या या धोरणाला त्यांच्या पक्षातच पुरेसा पाठिंबा नाही. गोवधबंदीबाबत सरकारने हट्टी धोरण स्वीकारू नये, असा सल्ला रघुनाथसिंगांसारख्या कार्यकर्त्यांनी दिला आहे. ते स्वत: पुरीला जाऊन आले व तेथे शंकराचार्यांशी त्यांची जी बोलणी झाली त्याचा अहवाल त्यांनी इंदिरा गांधी यांच्या कानांवर घातला आहे. शंकराचार्यांनी उपोषण सोडले तर इंदिरा गांधी यांनी लागलीच मुख्यमंत्र्यांची बैठक बोलवून गोवधबंदीची मागणी तत्त्वत: मान्य असल्याचे जाहीर करावे, अशी सूचना रघुनाथसिंगांनी केली आहे. ही सूचना इंदिरा गांधी यांनाही मान्य आहे. परंतु राज्य-सरकारे आपला हा आदेश मानतीलच याची त्यांना खात्री वाटत नाही व म्हणूनच शंकराचार्यांना तशी हमी देण्यास त्या राजी नाहीत. त्याचबरोबर या उपोषणामुळे शंकराचार्यांचा देहान्त झाला तर त्याचा निवडणुकीतील यशावर किती महत्त्वाचा परिणाम होणार आहे याचीही त्यांना जाणीव आहे. यामुळेच कसेही करून उपोषण सोडण्यास शंकराचार्यांना भाग पाडावे यासाठी रघुनाथसिंगांमार्फत प्रयत्न सुरू असून ते प्रयत्न कितपत यशस्वी होतात यावरच या प्रश्नाची सोडवणूक अवलंबून आहे.

फत्तेसिंगांच्या उपोषणामुळे निर्माण झालेली डोकेदुखी शंकराचार्यांच्या उपोषणाइतकी प्रखर नाही. याचे एक कारण तर असे की पंजाबी सुभ्याची मागणी पूर्णांशाने नाही तरी बऱ्याच प्रमाणात पुरी झाली असल्याने फत्तेसिंगांच्या उपोषणास शीख समाजाचा म्हणावा तसा पाठिंबा नाही. पंजाब व हरियाना या दोन राज्यांसाठी स्वतंत्र राज्यपाल व स्वतंत्र वरिष्ठ न्यायालय या फत्तेसिंगांच्या मागण्या मान्य

करण्याची आपली तयारी असल्याचे गृहमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांनी जाहीर केले आहे. वाद आहे तो चंडिगडचा. सध्या चंडिगड केंद्रशासित प्रदेश असून त्या शहरात दोनही राज्यांच्या राजधान्या आहेत. चंडिगड पंजाब राज्यात अंतर्भूत केले पाहिजे, ही फत्तेसिंगांची मागणी मान्य करणे आपल्याला शक्य नसल्याचेही केंद्र सरकारने कळविले आहे. कारण, तसे करण्याला हरियानाच्या नागरिकांचा तितकाच कडवा विरोध आहे. हरियानामध्ये जनसंघाचा विशेष जोर आहे. त्या राज्यांतील आर्यसमाजी नेते जनसंघात दाखल झाले असून त्यांचा प्रभाव राज्यकर्त्यांनाही जाणवत आहे. अशा परिस्थितीत हरियाना सरकारला पेचप्रसंगात टाकणारी फत्तेसिंगांची मागणी मान्य करणे केंद्र सरकारला मुळीच शक्य नाही.

## फत्तेसिंग एकाकी

प्रथम उपोषण व नंतर 'आत्मदहन' ही फत्तेसिंगांची धमकीही नवी नाही. १९६० च्या अखेरीसही त्यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. परंतु पं. नेहरू व मास्टर तारासिंग यांच्या वाटाघाटी झाल्यानंतर फत्तेसिंगांनी आपले उपोषण सोडले होते. त्यानंतर गेल्या वर्षीही त्यांनी आपला हा आत्मदहनाचा बेत जाहीर केला होता. परंतु त्याच सुमारास भारत आणि पाकिस्तान यांच्यांत युद्ध सुरू झाले. कै. लालबहादुर शास्त्री यांच्या आवाहनानुसार फत्तेसिंगांनी आपला बेत रद्द केला. त्यानंतरच्या वर्षभरात पंजाबी सुभ्याचा प्रश्न निकालात निघाला आहे. गेल्या १ नोव्हेंबर रोजी जुन्या पंजाब राज्याचे विभाजन होऊन पंजाबी सुभा व हरियाना ही दोन राज्ये अस्तित्वात आली. त्यामुळे सीमेवरच्या शीख बांधवांची गेली दहा वर्षे भिजत पडलेली मागणी पूर्ण झाली व आता तरी वादग्रस्त सीमेवर शांत व समाधानी वातावरण निर्माण होण्यास प्रत्यवाय नाही, असे केंद्र सरकारला वाटत होते. परंतु एवढे स्वास्थ्य मिळवून देण्यास फत्तेसिंग राजी नाहीत. गेल्या दि. १७ पासून त्यांनी उपोषण सुरू केले असून दहा दिवसांत आपली मागणी मान्य झाली नाही तर २७ डिसेंबरला आपण सुवर्णमंदिरावरच्या गच्चीवर स्वतःस जाळून घेऊ, असे त्यांनी जाहीर केले आहे. फत्तेसिंगांच्या या उपोषणाला पाकिस्तानी नभोवाणी सतत प्रसिद्धी देत असून शिखांना भारत सरकारविरुद्ध उठाव करण्याची चिथावणी देत आहे. सर्वसाधारण शीख माणसाला चंडिगडबाबत फत्तेसिंगांइतकाच जिव्हाळा वाटत आहे. परंतु त्याबरोबरच हरियानाची मागणी नाकारता येत नाही याचीही त्याला जाणीव आहे. या वस्तुस्थितीमुळेच फत्तेसिंगांच्या उपोषणाला त्यांचे मूठभर सहकारी सोडले तर इतरांचा पाठिंबा नाही. केंद्र सरकार या उपोषणाबाबत ताठर भूमिका स्वीकारीत आहे यामागेही हेच कारण आहे. परंतु त्याचबरोबर हे प्रकरण आत्मदहनाच्या टोकापर्यंत जाता कामा नये, अशीही काळजी केंद्र सरकारला घ्यावी लागणार आहे. अशा वेळी आठवण होते ती प्रतापसिंग कैरों यांच्यासारख्या कणखर



नेत्याची. पंजाबमधील शिखांच्या असंतोषाची झळ दिल्लीला जाणवू नये, यासाठी त्यांनी कितीतरी क्लृप्त्या योजल्या होत्या-आणि त्यामुळेच त्यांच्या इतर दुर्गुणांकडे पंडितजी दुर्लक्ष करीत असत. आता मात्र ही जबाबदारी नवे मुख्यमंत्री ग्यानी गुरुमुखसिंग मुसाफिर यांच्यावर पडली आहे. ग्यानीजीही पंजाबच्या दडपण-प्रति-दडपण पद्धतीच्या राजकीय डावपेचात मुरलेले आहेत आणि त्यामुळेच फत्तेसिंगांचे हे तिसरे उपोषण-पर्वही लवकर समाप्त व्हावे यासाठी त्यांची खटपट चालू आहे. त्यांचे आसन स्थिर राहण्यासाठीही या खटपटीची जरूरी आहे.

पंजाबमधल्या अशांततेचा विचार होत असतानाच शेजारच्या राजस्थानमध्ये कुंभराम आर्यप्रभृति चौघा जणांनी मंत्रिपदाचे राजीनामे देऊन मुख्यमंत्री मोहनलाल सुखाडिया यांच्याविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला आहे. कुंभराय आर्य व सुखाडिया यांच्यांतील मतभेदांनी गेल्या काही दिवसांत बरेच उग्र स्वरूप धारण केल्याची कॉंग्रेसश्रेष्ठींना कल्पना होती. तरी पण राजीनाम्याचा निर्णय मात्र त्यांना अनपेक्षित होता. राजस्थानमध्ये स्वतंत्र पक्षाचा जोर विशेष आहे. जनसंघाने या राज्यात मूळ धरले आहे. अशा परिस्थितीत कुंभराय आर्यांसारख्या जुन्या कार्यकर्त्याने मंत्रिमंडळा-तून बाहेर पडून राजस्थानमधील स्थिर राजवटीला चांगलाच धक्का दिला आहे. जनकॉंग्रेस, स्वतंत्र व जनसंघ यांच्याशी आर्य यांचा बंडखोर गट समझोता करून सुखाडिया यांच्या नेतृत्वाला आव्हान देण्याची शक्यता आहे. आणि त्याच दृष्टीने या तीन पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे एक सहकारी हरिश्चंद्र वाटाघाटी करीत आहेत. केंद्र सरकारच्या दृष्टीने एक प्रश्न सुटण्याअगोदरच दुसरा प्रश्न उपस्थित होत आहे व त्यातून मार्ग कसा काढावयाचा हाच केंद्र सरकार व कॉंग्रेसश्रेष्ठी यांच्यापुढील यक्षप्रश्न झाला आहे.

— सदाशिव पेठकर

●

# टुस्काफळे... 

## □ बाई विना बुवा

शंभूरावांचे लग्न झाले तेव्हा कार्याला वाजंत्री होती आणि वरातीला बँड होता.

कार्य धडाक्याने झाले. मुलाचे कार्य भरल्या डोळ्यांनी पाहून वडील गेले, परन्तु सर्वांनी शंभूरावांचे सांत्वन केले. म्हातारे माणूस केव्हातरी जायचेच! गेले तो क्षणही चांगला होता. तुमचे लग्न झालेले पाहिले, तुम्ही सुखाने नांदता की नाही कोण जाणे? ते पुढचे न पाहता ते गेले हे ठीक झाले. शंभूरावांनी डोळे पुसले. वडिलांचा फोटो ' एन्लार्ज ' करून घेतला आणि घरात लटकवला. कर्तेपण अंगावर कोसळले तेव्हा शंभूरावांचा लगेच सदाशिवरावभाऊ झाला. हा पराक्रम! तो पराक्रम! आणि महिना उलटण्यापूर्वीच शंभूरावांची बायको त्यांना सोडून गेली! हे कानांवर आले आणि यानंतर शंभूरावांना पुन्हा भेटण्याचा धीर कुणालाच झाला नाही.

कुणाचे वर्म काढू नये. शंभूरावांची मनःस्थिती ओळखून त्यांना चारचौघांत कुणी बायकोसंबंधी विचारीत नसे. लग्नाचा पहिला वाढदिवस आला आणि शंभूरावांनी लग्नाचा वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले. नातेवाईकांना धक्का बसला. त्यातले चार शहाणे एकत्र आले. भीतभीत शंभूरावांकडे गेले. आणि त्यांनी विचारले –

" आम्ही सांगू नये. परन्तु आपली बायको पळून गेली आहे ही गोष्ट लक्षात घेता आपण लग्नाचा वाढदिवस करू नये. "

शंभूरावांनी सांगितले, "ती नांदली नाही म्हणून काय झाले? लग्नाचा वाढदिवस उजाडणारच! तो साजरा केला तर तेवढेच मनाला समाधान लाभेल."

नातेवाईकांनी सांगितले, " लोक हसतील शंभूराव! बायको गेली आणखी वर हा खर्च करता हा मूर्खपणा आहे!"

शंभूराव संतापले. म्हणाले, " माझं तिच्यावर अजून प्रेम आहे हे जगाला कळलं पाहिजे! बायकोपेक्षा जग मोठे आहे. मरेपर्यंत मी हे वाढदिवस करणार आहे. १० जानेवारीला ताश्कंद करार झाला. पाळला पाकिस्तानने? माझी बाई गेली तशीच त्या कराराची शाई गेली. तरी होणार आहे ना त्याचा वाढदिवस? जग काय भारत सरकारला मूर्ख समजणार आहे? इतकेतरी शहाणपण माझ्याजवळ नक्की आहे. तुम्हांला माझी काळजी नको!"

नातेवाईकांत एक फार हळवा माणूस होता. त्याचा हृदयपालट झाला. तो गदगदत्या स्वरांत म्हणाला –

" पाळा हो ! शंभूराव तुम्ही वाढदिवस पाळाच ! तुमच्या लग्नाचा वाढदिवस झालाच पाहिजे. ताश्कंद कराराचाही वाढदिवस झालाच पाहिजे. "

## □ धोका

तोबा ! तोबा ! मराठी मंडळींची भारतीय क्रिकेटमधून हकालपट्टी सुरू झाल्यासारखी दिसू लागली आहे! ज्या त्या क्षेत्रात दक्षिण भारतीय व उत्तर भारतीयांनी मराठी माणसांना हुसकण्याची मोहीम उघडली आहे, हे मुंबईतल्या पहिल्या कसोटी सामन्याने अगदी नक्की सिद्ध केले. या त्यांच्या मोहिमेला ' वेस्ट इंडीयन ' संघानेही साथ द्यावी याचे कुणालाही विशेष दुःख होईल. यात काहीतरी काळेबेरे असावे. सरदेसाई, वाडेकर, नाडकर्णी यांनी पहिल्या डावात दहाही धावा करू नयेत आणि व्यंकटराघवनने नवव्या जागेवरदेखील ३६ नाबाद धावा कराव्यात याचा अर्थ काय ? वेस्ट इंडीज संघ फलंदाजी करू लागला तेव्हा पुन्हा तोच प्रकार ! नाडकर्णीला त्या लॉईडने असा बडवला, की नाडकर्णी स्वतःच टाळ्या वाजवू लागला. लॉईडला एवढे कळू नये की आपण मुंबईत खेळत आहोत. मुंबई महाराष्ट्राची आहे. दांड्या घेतल्या त्या चंद्रशेखरने ! मराठी माणसांना या उरल्या सुरल्या क्षेत्रातून हाकलण्याचे हे दक्षिण भारतीयांचे कारस्थान कुणीतरी चव्हाट्यावर आणलेच पाहिजे ! मुंबईसह महाराष्ट्र झाला तो काय स्टेडियमवर व्यंकटराघवन् आणि चंद्रशेखर यांनी खेळण्यासाठी ? तुम्ही म्हणाल, " ही स्पर्धा आहे, चांगला खेळेल तो टिकेल. अखेर आपण सगळे भारतीय आहोत. " काहीतरी सांगू नका बुवा ! उद्या मुंबईतल्या स्टेडियमवर खेळणाऱ्या भारतीय संघात औषधालाही मराठी माणूस राहणार नाही अशाने ! मराठी अस्मितेला हे आव्हान आहे.

या कटात तो मन्सूरअल्ली सामील असावा. दांड्या उडत असताना त्याने दुसऱ्या डावात वाडेकरला का पाठवले ? आपल्या दुराणी दोस्ताला का पाठवले नाही ? मुलाखतीत तो सांगतो, " आम्ही झेल सोडले म्हणून हरलो ! " बरोबर आहे. लॉईडचा झेल वाडेकरने सोडला असे सगळीकडे खोटेच पसरले आहे ना ! म्हणजे गंमत पाहा. लॉईडचा वेगाने जाणारा चेंडू वाडेकरने हात घालून अडवला आणि व्यंकटराघवन् जवळच नुसता ' खडा पारशा 'सारखा उभा राहिला. परंतु स्टेडियमवर खेळ पाहायला गर्दी होती ती मुख्यतः सटोडियांची आणि सिनेमाशौकिनांची. दुर्बिणीतून शर्मिला दिसते का सारखे पाहत होते ! एक म्हणाला, वाडेकरने झेल सोडला. दुसरा म्हणाला, वाडेकरनी झेल सोडला–आणि झेल सोडला म्हणून आपण हरलो काय ? अरे, तुम्ही रमाकांत देसाई आणि रांजणे यांना घेतले नाहीत म्हणून

हरलो ! दोन मराठी माणसे वाढतील म्हणून द्रुतगती गोलंदाजच नको म्हणता ! मद्रास सामन्यातून नाडकर्णी–वाडेकर गळतील, कलकत्याला सरदेसाईला उडवतील. हा खरा धोका आहे ! मराठी माणसाची काय ही दाणादाण !

## □ पूर्ण कुंभ कलंडला !

"लोकशाही सरकार हे एखाद्या ऊस मळ्यासारखे असते ! ज्याच्या दातांत ताकद असेल त्याने या उसाच्या कांड्याचा चावा घ्यावा. जसा दातांचा जोर असेल तसा मधुरस चाखता येईल. दातांतच जोर नसला तर मात्र हे उसाचे शेत डोळ्यां-पुढे नकोसे होईल."

कुणाचे बरे हे चाणाक्ष उद्‌गार ? आठवते का पाहा. २९ ऑक्टोबर १९६६ च्या 'माणूस' मध्ये मुक्ताफळे तुम्ही वाचली असतील. हे तेजस्वी उद्‌गार श्री. कुंभराम आर्य यांचे. राजस्थानचे हे महसूलमंत्री लोकशाहीविषयी इतके चांगले बोललेले पाहून भाकीत केलेच होते, की हे महसूलमंत्री हळूहळू गृहमंत्री व कालांतराने मुख्यमंत्री होतील ! असे वाटले होते की हे मक्कम कवळीचे मंत्री नवी नवी उसाची शेतं मनसोक्त चाखणार. परंतु नुकत्याच आलेल्या बातमीने सर्वांना हादराच बसला असेल. शेताच्या मालकांशी म्हणजे मुख्यमंत्री सुखाडिया यांचेशी तीव्र मतभेद झाल्याने उद्योगमंत्री हरिश्चंद्र महाराज व दोन उपमंत्री यांचे-सह श्री. आर्य यांनी राजीनामा सादर केला आहे. श्री. सुखाडिया हे सर्व शेतं आपली खासगी मालमत्ता समजतात, अशी यांची तक्रार आहे. तक्रार काहीही असली तरी राजीनामा देणे हे हितावह नाही. लोकशाहीत नेतेपद मिळविण्यासाठी मुख्य गोष्ट कुठली आवश्यक असेल तर चिकटून राहणे. महसुलाचे काय घेऊन बसलात ! मह-सूल सलामत तो मंत्री पचास ! राजीनामा दिलेल्या महाराष्ट्राचे महसूल मंत्री हिऱ्यांचे काय झाले ? डॉ. नरवणे यांचे काय झाले ? जी काही थोडीफार सत्ता हाती लागली असेल ती न सोडता घट्ट चिकटून राहणे हा गुण लोकशाहीत फार महत्त्वाचा असतो. सोयीप्रमाणे बोलावे, लोकांच्या काहीही लक्षात राहत नाही. पण खुर्ची सोडून नये. कुंभरामांसारख्या चाणाक्ष मंत्र्याचे पुढे कसे होणार ? एकदा का कुंभ कलंडला की त्यातील सत्तेचा 'बिबाकारू' भ्रंशला ! कुंभराम, पुनः विचार करा !

– ग्यानबा

# विचारांचे अराजक

( एस्. पी. कॉलेजसमोरच्या कट्ट्यावर दोन तरुण रात्री साडेअकरा वाजता सिगारेटी फुंकीत, गप्पा मारीत बसले आहेत. एक होतकरू कवी आणि दुसरा कुठल्याच राजकीय पक्षात नसलेला पण राजकारणात भयंकर इंटरेस्ट असलेला सरकारी नोकर. तिसरा 'माणूस' प्रतिनिधी. शिरा ताणून जोरजोरात चर्चा चालू आहे... )

सरकारी नोकर : इल्लॉजिकल, इररॅशनल, अँड इम्पॉसिबल...

कवी : परफेक्टली लॉजिकल अँड रॅशनल...

नो. : अरे, मग सिद्ध कर.

क. : मूर्ख आहेस. इट्स डॅम ईझी. जरा डोळे उघडून बघ. सिद्ध करण्याची गरजच नाही. आजच देशात सर्वत्र अराजकाची चिन्हं स्पष्ट दिसताहेत. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही. सर्वच असंघटित. शासन असंघटित, राजकीय पक्ष असंघटित, भ्रष्टाचार असंघटित, चळवळी असंघटित, फार काय दंगेधोपे, मारामाऱ्याही असंघटित. यांपैकी एक जरी 'गोष्ट' संघटित असतीना तर आय कुडण्ट हॅव मेड माय स्टेटमेंट... बस्स्, टेक इट फ्रॉम मी. अराजक... अनार्की...आपला देश अराजकाच्या उंबरठ्यावर उभा आहे...

नो. : अरे, हो...हो...एकदम एवढा निराश होऊ नकोस...तू तुझ्या विकृत नजरेनी जगाकडे बघतो आहेस.

क. : नॉन्सेन्स् ! कोण म्हणतो मी निराश आहे आणि विकृत आहे. माझ्या दूरदृष्टीला जे दिसतं ते मी स्पष्ट बोलतो. अँड आय सी नथिंग बट अनार्की इन ऑफिंग...

नो. : तेच मी म्हणतोय. कसली अनार्की आली आहेय् रे. जरा आजूबाजूला डोळे उघडून बघ तूही. एवढी मोठी स्थिर लोकशाही आहे का दुसरीकडे जगात. आणि आता होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुका एवढ्या प्रचंड प्रमाणावर निवडणुका कुठे होतात ?

क. : हा: हा, निवडणुका ! निवडणुकांचं सांगू नकोस मला. तीस कोटी मतदारांपैकी किती जणांना आपण कशासाठी मत टाकतो हे तरी माहीत असतं का ? सरळ मतांचा बाजार चालतो आणि म्हणे लोकशाही–!

नो. : हेच हेच ते. हीच ती विकृत दृष्टी. संकुचित दृष्टी. मतांचा बाजार, संघटनहीनता, अराजक–या साऱ्या गोष्टी आपल्या शहरी नजरेलाच दिसतात. लोकांचा असंतोष आपल्यालाच फक्त ऐकू येतो. जरा खेड्यांत जाऊन बघा. म्हणजे दिसेल लोकशाहीची मुळं कशी खोल गेली आहेत ते. मिस्टर, कॉंग्रेस आणि लोकशाही या देशातून जायला

तुमच्या पिढ्या जाव्या लागतील. आणि अराजक तर तुमच्या आयुष्यात पाहायला मिळणार नाही.

क. : असं म्हणतोस ? मग घोडा-मैदान जवळच आहे. या निवडणुकांनंतर बघ. एक-दोन राज्यांत तरी विरोधी पक्षाचं सरकार येतं आहे. मग ऐकू येतील तुम्हांला अराजकाच्या नांदी. अरे आत्ताच बघ ना. खुद्द काँग्रेस पक्षात अराजक. देशाच्या पंतप्रधानांचं कुणी त्यांच्याच पक्षात ऐकत नाही. भांडताहेत आपापसात. विरोधी पक्षांत एकवाक्यता नाही. काँग्रेसला खेचून स्थिर सरकार देऊ शकणारा विरोधी पक्ष नाही. एकाही विरोधी पक्षाची लोकांवर पकड नाही. रोज गोळीबार होताहेत. दंगे होताहेत. आणखी कसलं आलं आहे अराजक—

नो. : सीनिक यू आर—काँग्रेसमधली भांडणे ही तात्कालीन आहेत, स्वतंत्र, जनसंघ, सं. सो. पा. यांच्यासारखे पक्ष आज ताकद कमावताहेत. उद्या होतील तयार, सत्ता काबीज करायला. झालंच तर कम्युनिस्ट आहेत. ते स्थिर सरकार देऊ शकणार नाहीत, असा विचार तू का करू शकत नाहीस ?

क. : फूलीश. राजकारणाची तुला काहीच समज नाही. काही विरोधी पक्षांना अराजकच हवे असते. किंबहुना अराजक निर्माण करणे हेच त्यांचं ध्येय असतं. त्याशिवाय ते राज्यावर येऊच शकत नाहीत, हे तुला कसं समजत नाही? आणि निवडणुका ही तर असंतोष आणि अराजक वाढविण्याची पर्वणी—

नो. : मला नाही वाटत. सरसकट सर्व विरोधी पक्षांना अराजक हवे असेल म्हणून. काही पक्षांना तर नक्कीच नाही.

क. : म्हणून काय येणारे अराजक थांबते आहे होय ?

नो. : अरे, पण तुमचा आपला काही रोल आहे की नाही या लोकशाहीत ! आपण नाही आळा घालू शकत नाही या अराजकी वृत्तीला ? अराजकी वृत्ती असेल देशात थोड्याफार प्रमाणात. पण लोकशाहीवादी मंडळीही मोठ्या संख्येने आहेत. येत्या निवडणुकीतच तुला दिसेल. तू मत देणार आहेस की ?

क. : ऑफ कोर्स देणार तर. पण माझ्या उमेदवारांना देईन. पक्षांना मत देऊन काहीच उपयोग नाही. किंबहुना मला तर वाटतं या आपल्या मतदानाचा काहीच उपयोग नाही. कारण निवडणूक, निवडणुकीनंतर पुन: असंतोष, अराजक आणि नंतर फुटीर वृत्तींना आवळून धरणारी पक्षीय किंवा व्यक्तिगत हुकूमशाही हा मार्ग मला स्पष्ट दिसतो आहे.

नो. : हे तुझ्या विचारांचे अराजक आहे. डोक्यातले अराजक आहे—

क. : झूट. स्टुपिड...

नो. : यू स्टुपिड...

( आवाज वाढत जातात. सारा टिळक रस्ता रात्रीच्या त्या शांत वेळी दणाणून जातो. मुद्यांवरून गुद्यांवर चर्चा येते की काय अशी भीती वाटू लागते. एवढ्यात रात्रीचे गस्त घालणारे शिपाई दंडे आपटत जवळ येऊ लागतात आणि पुन: दबलेल्या आवाजात या वैचारिक अराजकावर पूर्ववत चर्चा सुरू होते..) □

## मद्रास

# काँग्रेसला सुरक्षित बहुमत

भारतातील स्थिर आणि प्रगत राज्यांमध्ये मद्रासचा बराच वरचा क्रमांक लागतो. गेली वीस वर्षे काँग्रेस पक्षाने त्यातल्या त्यात शिस्तबद्ध, स्वच्छ आणि व्यवहार-कुशल शासन मद्रास राज्याला दिले आणि त्यामुळेच येत्या निवडणुकीत मद्रास-मध्ये विजय मिळविण्याची या पक्षाला खात्री आहे.

सार्वत्रिक निवडणूक जरी काँग्रेसने जिंकली तरी तेवढ्यावर मद्रासमध्ये काँग्रेसने आत्मसंतुष्ट राहावे, अशी अद्याप परिस्थिती नाही. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीच्या हिशेबातच बोलायचे झाले तर मद्रास राज्यात झालेल्या एकूण मतदानाच्या केवळ ४५ टक्के मतेच काँग्रेसला मिळाली. पण ५५ टक्के विरोधी मते फुटलेली असल्या-मुळे काँग्रेस पक्ष मद्रास विधानसभेतील २०६ जागांपैकी चांगल्या १३६ जागा मिळवू शकला. म्हणजे एकूण जनमताचा कल विरोधी पक्षांच्या दिशेने वाहतो आहे. पण विरोध असंघटित असल्याने काँग्रेस सुरक्षितपणे राज्यावर आहे ही साऱ्या देशा-तील परिस्थिती मद्रासमध्येही प्रकर्षाने आढळते.

या विरोधी लोकमताला जास्तीत जास्त संघटित करण्याचा प्रयत्न मद्रासमधील प्रमुख विरोधी पक्ष द्रविड मुन्नेत्र कळघमने चालविला आहे. आणि काँग्रेसचा परा-भव करण्याच्या ईर्ष्येने मुस्लीम लीग, स्वतंत्र, डावे कम्युनिस्ट यांसारखे एरवी एक-मेकांचे तोंडही न पाहू शकणारे पक्ष द्रविड मुन्नेत्र कळघम्च्या पाठीशी उभे राहत आहेत.

### द्रविड मुन्नेत्रचा कायापालट

केवळ मद्रास राज्यातच अस्तित्वात असलेल्या द्रविड मुन्नेत्र कळघम् या पक्षाची स्थापना झाली होती ती मूलत: स्वतंत्र द्रविडीस्तानच्या मागणीसाठी. हिंदूविरोधी—विशेषत: ब्राह्मणविरोधी आणि उत्तर हिंदुस्थानविरोधी—द्रविड चळवळीचे नेतृत्व या पक्षाने स्वीकारले होते आणि स्वतंत्र द्रविडीस्तानच्या मागणीसाठी चळवळी आरंभल्या होत्या. पण पुढे आपल्या मागणीतला फोलपणा कळून नुकताच पक्षाने आपला पवित्रा बदलला. सार्वभौम द्रविडीस्तानऐवजी 'भारतीय संघराज्यातच स्वयंशासित द्रविडीस्तान' अशी घोषणा स्वीकारली आणि या मागणीवर विशेष

भर न देता व ब्राह्मणविरोधी नकारात्मक चळवळ न स्वीकारता हिंदी भाषाविरोधी चळवळ पक्षाने हाती घेतली व कनिष्ठ जातींच्या प्रश्नांना वाचा फोडण्यास सुरुवात केली. त्यामुळे काही जातींमध्ये हा पक्ष बराच लोकप्रिय झाला. गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत या पक्षाला एकूण २७ टक्के मते मिळून मद्रास विधानसभेच्या ५० आणि लोकसभेच्या ७ जागा मिळाल्या होत्या.

स्वतंत्र पक्षाचे संस्थापक असलेल्या चक्रवर्ती राजगोपालाचारी यांच्या या मायभूमीत मात्र त्यांच्या स्वतःच्या पक्षाला विशेष स्थान नाही. गेल्या निवडणुकीत स्वतंत्र पक्षाला मद्रास विधानसभेत अवघ्या ९ जागा मिळाल्या होत्या. पण राजाजींची लोकप्रियता अमाप आहे. निदान काँग्रेसला तरी जागा मिळू नये म्हणून द्रविड पक्षाच्या थोडयाशा साम्यवादी धोरणाकडे दुर्लक्षच करून ते त्या पक्षाला सतत पाठिंबा देत आहेत. आणि त्यामुळेच स्वतंत्र पक्षाने द्रविड मुन्नेत्र कळघम्‌शी या निवडणुकीपुरता समझोता केला आहे.

## विचित्र शय्यासोबत

द्रविड पक्षाने स्वतंत्रांशी चालविलेल्या चुंबाचुंबीकडे दुर्लक्ष करून डाव्या कम्युनिस्टांनीही त्याच्याशी समझोता केला आहे. स्वतंत्र, डावे कम्युनिस्ट आणि द्रविड मुन्नेत्र कळघम यांची ही शय्यासोबत वाटते तेवढी विचित्र नाही. ही सोवत घडवून आणण्यात द्रविड नेते श्री. अण्णा दुराई यांनी खरा धूर्तपणा दाखविला आहे. स्वतंत्र पक्षाने आणि डाव्या कम्युनिस्टांनी एकमेकांशी करार केले नाहीत. त्यांनी करार केले आहेत द्रविड मुन्नेत्र कळघम्‌शी. स्वतंत्र पक्षाचे आणि डाव्या कम्युनिस्टांचे मतदार संघच असे आहेत की त्यांचा एकमेकांशी संघर्ष होणे शक्य नाही. त्यामुळे स्वतंत्र पक्ष ज्या ३५ विधानसभेच्या आणि १७ लोकसभच्या जागांसाठी आपले उमेदवार उभे करणार आहेत त्यांना आणि डावे कम्युनिस्ट ज्या २५ विधानसभेच्या आणि ६ लोकसभेच्या जागांसाठी आपले उमेदवार उभे करणार त्यांना द्रविड मुन्नेत्र कळघम संपूर्ण पाठिंबा देऊन आपल्या सर्व १५० विधानसभांच्या आणि २० लोकसभांच्या जागांसाठी या दोन्ही पक्षांचा पाठिंबा मिळविणार आहे. बोलणी अद्याप नक्की व्हायची आहेत. उमेदवारांची संख्या कमीजास्त होईल. पण या तीन पक्षांचे निवडणुकीपुरते हे सख्य जवळ जवळ ठरल्यासारखेच आहे.

मुस्लीम लीग, संयुक्त समाजवादी पक्ष, फॉरवर्ड ब्लॉक आणि मद्रासमधील वन्नीकुला क्षत्रियांचा एक छोटा पक्ष हेही या विरोधी आघाडीत सामील होण्यास उत्सुक आहेत आणि त्यांच्याशीही द्र. मु. क. पक्षाची बोलणी चालू आहेत. प्रश्न आहे तो केवळ उजव्या कम्युनिस्टांचा. मद्रासच्या उजव्या कम्युनिस्ट पक्षाने आपली निवडणुकीची उमेदवार यादी कुणाशीही बोलणी न करता आधीच जाहीर करून टाकली आहे. याला कारण म्हणजे एकतर इतर राज्यांप्रमाणेच इथेही माजलेले डाव्या-उजव्यांचे द्वंद्व आणि दुसरे म्हणजे विरोधी आघाडी उभारण्यापूर्वी उजव्या कम्युनिस्ट

पक्षाने किमान कार्यक्रम निश्चित करण्याचा आग्रह धरला होता. आणि किमान कार्यक्रम निश्चित करण्यास द्र. मु. क. ने नकार दिला होता.

## विरोधी मत

तेव्हा उजव्या कम्युनिस्टांमुळे फुटलेले विरोधी मत आणि विरोधी आघाडीतील कार्यक्रमाचा अभाव हे मुद्दे तर काँग्रेसला सोयीस्कर आहेतच. पण त्याचबरोबर गेल्या पाच वर्षीतील काँग्रेसचा कारभारही मद्रासमध्ये काँग्रेसविषयी साधारण अनुकूल वातावरण निर्माण करीत आहे. कनिष्ठ जमातींना, शेतकऱ्यांना अनेक सवलती गल्या पाच वर्षांत देऊन काँग्रेसने द्र. मु. क. चे मत फोडण्यात यश मिळविले असले पाहिजे. शिवाय इतर राज्यांप्रमाणेच विरोधी पक्ष ज्या जातीचा उमेदवार उभा करील त्याच जातीचा उमेदवार आपणही उभा करायचा हे तत्त्व काँग्रेस इथेही कटाक्षाने पाळते.

काँग्रेसचे अध्यक्ष कामराज, मुख्यमंत्री भक्तवत्सलम आणि माजी अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी यांनी नुकतेच मद्रासचे दौरे केले आणि एकंदर परिस्थिती बघून त्यांनी असा आत्मविश्वास दाखविला आहे की येत्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस विजयी होईलच, पण त्याचबरोबर काँग्रेसच्या मतांची टक्केवारीही वाढेल.

मद्रास विधानसभेची वाढलेली संख्या २३४ आहे. विरोधी पक्षांच्या हिशेबाप्रमाणे सर्व विरोधी मत फुटले नाही तर विरोधकांना एकूण १२५ ते १३० जागा मिळाव्यात. पण काँग्रेसच्या अंदाजाप्रमाणे विरोधकांना ८०, जास्तीत जास्त १०० जागा मिळतील आणि विधानसभेतील काँग्रेसचे बहुमत अधिकच वाढेल.

काँग्रेसच्या अंदाजाप्रमाणे काँग्रेसचे बहुमत वाढेल की नाही, हे जरी निश्चित सांगता येत नसले तरी मंत्रिमंडळ बनविण्याइतपत सुरक्षित बहुमत मद्रास विधानसभेत काँग्रेसला सहज मिळेल असे बेलाशक सांगता येईल.

●


**फ्री – मोफत – फ्री**

मुंबई वरळी मटका डेली चार्ट

दररोज बरोवर — आजच लिहा

**महालक्ष्मी फोरकास्टिंग सर्व्हिस**

ब्रांच पोस्ट ऑफिस गुन्डिआली

सब-पोस्ट–मांडवी, जिल्हा कच्छ, गुजराथ राज्य

# विचारवारे

– समीर

## □ वाङ्मय आणि मानसशास्त्र

दिल्लीत जगातल्या सर्व विषयांवर परिसंवाद होतात, तेव्हा इंग्रजी वाङमयावरही असा एक परिसंवाद नुकताच झाला यात आश्चर्य नाही. शिवाय तो आंतरराष्ट्रीय होता, हे ओघानेच आले. या परिसंवादात भाग घेण्यासाठी लंडन विश्वविद्यालयाचे मानसशास्त्राचे प्राध्यापक हार्डिज हे आले होते. आता मानसशास्त्राचा वाङमयाशी किंवा वाङमयाच्या रसास्वादाशी काय संबंध ? प्रा. हार्डिज यांचे उत्तर –पुष्कळच. एखादी कलाकृती का आवडते याचे उत्तर मानसशास्त्राने उघडकीला येते " विशेषत: ती कलाकृती का आवडते हे गूढ असेल तर. " उदाहरणार्थ, कोलरिज या प्रसिद्ध इंग्रजी कवीची " एन्शंट मॅरीनर " ही विख्यात कविता घ्या. सकृद्दर्शनी ती सुलभच वाटते, लहान मुलांच्या परीकथेसारखी वाटते, पण तिच्यात बराच खोल अर्थ भरला आहे. या कवितेतला अल्व्ट्रॉस पक्षी हा सहकार्याचे प्रतीक आहे, पण कवितेचा नायक जेव्हा त्याच्याकडे पाठ फिरवतो तेव्हा एकाकीपणाची भावना त्याचे मन व्यापून टाकते. कवितेला हा मध्यवर्ती भाव आहे. अशा रीतीने मानसशास्त्राच्या दृष्टीतून पाहिले तर वरवर केवळ एक चित्तवेधक गोष्ट वाटणाऱ्या या कवितेचा भावार्थ नक्कीच अधिक समजतो.

उलट नाटकातली पात्रे आणि प्रेक्षक यांच्यामध्ये एक प्रकारचा मानसशास्त्रीय दुवा असतो असे म्हटले जाते, त्याबद्दल प्रा. हार्डिज साशंक आहेत. प्रेक्षकाला तादात्म्य, अप्रत्यक्ष समाधान, इच्छापूर्ती ' इत्यादी भावना अनुभवायला मिळतात, असे म्हणतात. पण बारकाईने पाहिले तर प्रेक्षकाला नायकाशी तादात्म्य पावता येत नाही असे दिसते. कारण प्रेक्षक इतर अनेक गोष्टींचा विचार करीत असतो.

पण साहित्यिक कलाकृतीचा रसास्वाद घेण्याच्या मार्गात मानसशास्त्राने अडथळा निर्माण केला तर ते मात्र अनिष्ट ठरेल. फ्रॉइडच्या दृष्टिकोनातून वाङ्मयाकडे पाहण्यात येऊ नये.

## □ निवडणुकीच्या आधीचा भारत

" राज्यशास्त्राच्या दृष्टीने निवडणुकीच्या थोडासाच आधीचा काळ हा भारतभेटीसाठी अगदी योग्य काळ आहे, " असे मत अमेरिकेतील टेक्सस विश्वविद्यालयातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. जेम्स रोच यांनी दिल्लीत काही दिवसांपूर्वी

प्रकट केले. तीन महिन्यांच्या येथल्या वास्तव्यात ते उत्तर प्रदेश व राजस्थानात जनसंघ, मद्रासमध्ये द्रविड मुन्नेम कळघम, केरळात साम्यवादी पक्ष, आणि स्वतंत्र पक्ष हे विरोधी पक्ष काय करणार आहेत, याचे अध्ययन करतील. हिंदुस्थानातील एकूण राजकीय परिस्थितीचे आतापर्यंत चांगले निरीक्षण झाले आहे आणि काँग्रेस पक्ष कसे काम करतो याचीही आतापर्यंत चांगली कल्पना आली आहे. तेव्हा आता राज्यशास्त्रीय संशोधनाची दुसरी पायरी येऊन ठेपली आहे. ती म्हणजे निर-निराळ्या प्रांत राज्यांत व जिल्ह्यांत, काँग्रेस कशी चालते याचे तपशीलवार अध्ययन आणि विरोधी पक्ष कसे काम करतात व त्यांच्यांत जनतेला पटण्यासारखे काय याचा आहे अभ्यास.

एकंदर निवडणुकीचा रागरंग डॉ. रोच यांच्या मते काय आहे ? काँग्रेसला बऱ्याच प्रांत राज्यांत चांगला शह मिळणार असे दिसते. (उदाहरणार्थ, मध्य प्रदेश, ओरिसा, राजस्थान.) एखाद-दुसऱ्या प्रांतराज्यात ती हरण्याची शक्यता आहे. निवडणुकीची प्रत्यक्ष वेळ येऊन ठेपेपर्यंत साम्यवाद्यांतला डावे-उजवे हा भेद फारशा ठिकाणी दिसणार नाही. "तसे ते मोठे धूर्त राजकारणी आहेत."

पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे निवडणुकीत सर्वसाधारणपणे लोकशाही तंत्र सांभाळण्यात भारत 'खूपच यशस्वी' झाला आहे. या भूभागात हिंदुस्थान व फिलिपाईन्स– व आता आता मलेशिया व सिलोन– एवढेच देश नियमित काला-वधीनंतर लोकशाही मार्गाने निवडणुका घेऊ शकले आहेत. अर्थात् "भारताएवढ्या प्रचंड प्रमाणावर कुठल्याच देशाने हे काम केलेले नाही."

## □ 'ब्रेन ड्रेन'ची जागतिक समस्या

वैद्यकीय शिक्षणावर एक जागतिक परिषद नुकतीच दिल्लीला झाली. अर्थात उच्च शिक्षणासाठी परदेशी जाऊन मग तेथेच राहणाऱ्या भारतीय डॉक्टरांचा प्रश्न निघाला. या चर्चेचा प्रारंभ करताना लॉर्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचे प्रमुख डॉ. कॅन्डो म्हणाले की, 'ब्रेन ड्रेन'ची ही समस्या मोठी कठीण असून तिच्यावर एखादा जागतिक उतारा शोधून काढणे शक्य नाही. शिवाय ही समस्या केवळ वैद्यकीय व्यवसायापुरती मर्यादित नसून इतर व्यवसायातही दिसून येते. हा प्रश्न राष्ट्रीय पातळीवरच सोडविणे शक्य आहे. ब्रिटनसारख्या सुधारलेल्या देशांतही 'ब्रेन ड्रेन'ची समस्या आहे. मागासलेल्या देशात ही समस्या त्या त्या देशात नांदणारी अस्थिरता, उच्च शिक्षण व संशोधनासाठी आवश्यक असणाऱ्या साधनांचा अभाव आणि निकृष्ट दर्जाचे जीवनमान या मुख्य कारणांमुळे उद्भवली आहे.

●

## भार

ऐहिक सुखास
मन हे भाळले
व्यर्थ दवडले क्षण क्षण
मोहापायी नित्य
विवेक ढळला
विसर पडला सृजनांचा
आता डोळ्यापुढे
दिसतो अंधार
जीवनाचा भार साहवेना

— गोविंद कुलकर्णी

## आराधना

शून्य वाट तम हताश
सभोवताली वादळे
अन् मनि व्यथा जपीत
मी इथे अशी जळे
मी इथे अशी जळे
बोचरी उरात खंत
गीत गात भैरवीत
खिन्न म्लान आसमंत
खिन्न म्लान आसमंत
मेघ मंद हासले
सांजरंग पांगताच
क्षितिजही उसासले
क्षितिजही उसासले
नि खिन्न चांदणी नभी !
धुंद मी तुझ्या लयीत
स्वर-स्वर गुंफीत उभी !

—सदाशिव करंदीकर

## योगायोग

सुस्तावून पडलेली वेगवती खळखळ
मौन पांघरुन लोळणारे थकून किनारे
देठातून गोठलेला विजगती प्राण
उदास वारे, श्वास करपलेले तारे
जडावलेले फिके बेशुद्ध रान
टिटवीचा काळा शब्द. जहरी धार
ओकणारा मार्मिक श्वान.
फडफडणारे कावळ्यांचे पंख
लयीत हेलावणारे भोवती उदास स्मशान
...आणि पेटणारी माझी चिता
पेटणाऱ्या सरी सरी
अशांत भेटलेली सुखावून तू
शोधाअंती गवसून तुझीच चोरी...

—यशवंत मनोहर

## सीमा

लाट लाट झालो तरी किनाऱ्याची उभी सीमा
नभ नभ झालो तरी क्षितिजांची दिसे तमा
काय दिले असे स्वप्न त्याला सीमेचेच पंख
आज असा जळे जीव त्याला प्रकाशाचा डंख
पाणी पाणी मन असे फक्त वाहते वाहते
पाय चालता चालता गति हरवून जाते
वाटे हीच का पुण्याई नको असा छंद झूला
फक्त चालून येण्याचे लाभे काजळ डोळ्याला
रात्रंदिन डोळ्यांतील किती उपसू गा पाणी
ओठाआड अडलेली माझी वादळकहाणी
ढग झुंजावा ढगाशी वीज व्हावी व्यथावेडी
त्याच एका क्षणासाठी उभी उन्हात झोपडी !

— राजा महाजन

# आस्वाद

जीवन भारभूत व्हायला वयच व्हावे लागते, असे नाही. मध्येच एखादी अनुतापाची जबरदस्त लाट आली, की जीवनाचा 'भार' वाटू लागतो. गोविंद कुलकर्णी यांनी हेच चितारले आहे. मोजक्या शब्दांत. पण यांत पारंपरिक कल्पनांचा बोजा बराच आहे. अगदी साधा संतकवी जसे अनुतापाचे उद्‌गार काढील तसे उद्‌गार वाचायला मिळतात. पण ते खरे असल्याचे वाटते एवढे समाधान.

प्रेमभंग हे मरणच यात शंका नाही. 'योगायोग' या कवितेत पेटलेली चिता फार परिणामकारक आहे. प्रेमविजेत्यालासुद्धा क्षणभर उदास करील असे वातावरण तीमध्ये आहे. विशेषणांना अकल्पित अशी सोबत मिळवून देण्यात नवीन कवी जे कौशल्य दाखवितात ते यशवंत मनोहर यांनी चांगल्या तऱ्हेने प्रकट केले आहे. त्यांच्या टिटवीचा शब्द काळा आहे, आणि श्वान मार्मिक आहे ! स्मशान आहे ते लयीत हेलावणारे. कुणाची चिता पेटली, की स्मशानाला तेवढेच बरे वाटते की न कळे ! नाहीतर स्मशानाला एवढी आनंदाची लहर का आली असती ?

कल्पनेच्या पंखांनी मन भराऱ्या मारू लागले तरी त्याची धाव कुठेतरी अडतेच. भावना नुसत्या वाहत राहतात. कित्येकदा या क्रियेतच त्यातली गंमत हरपून जाते. परंतु कवीची प्रतिभा तर युयुत्सू आहे. कशासाठी तरी झगडते आहे. किंबहुना अनिर्बंध असे काही भोगावे यासाठी आतुरलेली आहे. 'सीमा'ची हीच फलश्रुती. राजा महाजन यांनी हे सारे नियमबद्ध छंदांत रेखाटले आहे. पण काही कल्पना अधांतरी लोंबकळत राहतात. पहिले कडवे त्या मानाने अधिक स्पष्ट आणि बांधेसूद आहे. शेवटच्या दोन ओळींत पूर्वीच्या शिलेदारांसारखे प्रणयासाठी कंपयुद्ध उभे राहणार आहे, असे चित्र डोळ्यांपुढे उभे राहते.

'आराधना' कवितेत एक शिल्प आहे. काही नियमबद्ध गुंफण आहे. प्रत्येक कडव्याची शेवटची ओळ पुढील कडव्यांतली पहिली ओळ होते. त्यामुळे जे रंगवायचे आहे ते अधिक दाट होत जावे, अशी करंदीकरांची कुशल योजना दिसते. मेघ पांगल्यावरोबर क्षितिजाने उसासा टाकला आणि नंतर चांदणी आली. या वर्णनात संगती आणि गतिमानता चांगली आली आहे. ही आलेली चांदणी आणि कवितेची नायिका जणू एकरूपच आहेत, अशा कल्पनेत रसिक रंगून कविता संपवितो.

*—गोपीनाथ तळवलकर*

# पीक

## का. म. आल्हाड

गावात शिवरात्रीची यात्रा पंधरा दिवसांवर आली होती. सकाळी शेमीगोंडा व दुपारी कुस्त्या होणार होत्या. पंचक्रोशीतले व तालुक्यातले भिरके जमणार होते. मोठी जंगी यात्रा भरणार होती. रात्री रंगी नाचणारणींच्या तमाशाची कनात गाजणार होती. सोनू मांगाचं शिंगाडं शेमीगोंडयाच्या मैदानावर वाजणार होतं अन् दुसऱ्या दिवशी कुस्त्यांच्या वेळी हलगी घुमणार होती.

गावच्या शेमीगोंडयाच्या वेळी जिंकणाऱ्या माणसाजवळ जाऊन सोनू आनंदाने ओवाळणी मागणार होता. त्याचा पुतण्या कुस्त्याच्या दिवशी 'डफडं' वडवणार होता. कारण त्याच्या पोरानं वनसगावच्या दामू वाघाकडं लाचारीनं सालं धरलं होतं. दामू वाघानं तिगस्ता जान्या गाईचा गोऱ्हा ग्रामपंचायतीकडून लिलावानं विकत घेतला होता. तो ह्या शर्यतीत भाग घेणार होता. त्या गोऱ्ह्याला लहानपणापासून कुठंही चरायला मुभा होती. त्यानं कुणाच्याही शेतातल्या पिकांचा 'हैदोस' केला तरी त्याला गुन्हा माफ होता. तसा तो मस्त होता. त्याच्या विरुद्ध बाजूला शंकर पाटलाचा घरच्या गाईचा गोऱ्हा व एक 'गघाड' धावणार होतं व त्यांची ह्या वावतची बोलणी लासलगावच्या बाजारात झाली होती. ही कुणकूण सोनूच्या पोराच्या कानांवर आली होती. ती त्यानं एका रात्री वस्तीवर आल्यावर सोनूच्या कानीं घातली होती. कुस्ती ठरलेले पहिलवान दररोज हौद्यात उतरून 'पकड' खेळतात अगदी तसंच ते न चुकता सायंकाळी भिरकं पळवायची 'प्राक्टीस' करायचे.

एके दिवशी सकाळी सोनू झोपडीच्या बाहेर आला अन् दाताला मिश्री लावीत बसला. दात घासण्याचं काम चालू असतानाच शंकर पाटील त्याच्या दृष्टीस पडला त्याचा त्याच्या डोळयांवर विश्वास बसेना. त्यानं भिरकं मांगवाडयाकडं वळवलं तेव्हा

जोड्या चांगल्या लागल्या.
पण लोकांचे लक्ष लागेना.
त्यांना शर्यत पाहावयाची होती —
ती पाटलांच्या गोऱ्ह्याची.
अजून पाटलाचा गोऱ्हा का आला नाही ?
कुजबुज वाढायला लागली.

तो आपल्याकडंतर येत नाहीना, अशी त्याला क्षणभर शंका आली. अन् दोन महिन्यांपूर्वी घडलेला प्रसंग त्याच्या डोळ्यांसमोर तरळला.

आपण लखू पाटलाची घायपाताची ताटी घेतली होती. ती तोडली होती अन् पार खच्ची केली होती. तरी पार खच्ची केल्याबद्दल लखू पाटलानं हासडलेल्या शिव्या खाली मान घालून झेलल्या होत्या. नदीला ह्याच वर्षी पाणी टिकलं म्हणून तीत घायपात भिजत घातलं होतं. ते घुण्याकरिता पोरं उपाशीतापाशी नदीवर नेली होती. 'खुशीचा दिवस' होता तो! पुढच्या बाजाराला मिरासाठी कटकीची चोळी घेणार होता. कारण चार महिन्यांपासून तीच ती चोळी ती घालीत होती. तिचे धुण्यावर धुणे होत होते. धुऊन ती आटली होती. विरली होती. फाटक्या चोळीतून तिच्या दोन्ही हाताचे काळेकुळकुळीत दंड दिसत होते. अन् ते काळे असून चमकत होते. जाणारे येणारेसुद्धा हावरटासारखे दंडावर समाधान न मानता दुसरीकडे कुठे चोळी फाटलेली आहे की काय, म्हणून सारखे पाहात राहत. तिनं त्याकडे पाहिल्यावर खिळलेली नजर ते काढीत अन् ती मग छातीवर पदर घेई.

सोनूनं हे कितीदा तरी पाहिलं होतं. त्याकडं त्यानं दुर्लक्ष केलं होतं. तरी बापडा त्याला काय करणार ? कितीही केलं तरी लाचारीनं जगणारी जात !

खोलवाटेनं नदीच्या रस्त्याला लागलो तेव्हा भिजत घातलेल्या घायपाताचा घाण वास नाकात घुसला होता. घायपात चांगलं भिजलं अन् रापलं म्हणून असा वास येतो हे त्यानं ताडलं. तीन प्रहरी जमल्यास मीराच्या हाताला खेराडी देऊन कासरे करणार होता. पण तेथे जातो न जातो तोच गाळानं व वाळूनं बांधलेला बंधारा कोणीतरी फोडला होता. साचलेले पाणी मोकाट वाहत होतं अन् रापलेलं घाय-



पात कोणीतरी लांबवलं होतं व काही पेटचा वाहत गेल्या होत्या. हे विचार चालू असतानाच शंकर पाटील त्याचं भिरकं घेऊन झोपडीशी येऊन ठाकला. तेव्हा सोनूनंच विचारलं, " लई सकाळीच येणं केलं ?"

" काई इशेश काम नाई, बैल फक्त बडवायचा आहे. " शंकर पाटलानं म्हटलं. बैल वडवायचं काम आपल्याकडे हा घेऊन आला. त्याला नकार देता येईना पण शंकर पाटलानं फारच वाईट गोष्ट केली ती त्याच्या स्मरणातून जाईना. त्यावर तो विचार करीत राहिला. ह्यानंच आपल्याजवळ गजाबाच्या हॉटेलात घाय-पाताच्या पेंढ्या मागितल्या होत्या. त्या त्याला बैलाचे ' मुसके ' बनविण्याकरिता पाहिजे होत्या. त्याला दोन–तीन दिवसांत पेंढ्या देतो हे कबूल करूनही त्यानं ऐकलं नव्हतं. हे लांबणीवर टाकलेले झोंबडे त्याला आवडले नव्हते. म्हणून " याद राख, माझ्याशी गाठ हाय. आवंदाचं पाणी टिकलं तर सुकडीचे माजले जण !" ही हरसाल शिवी त्यानं दिली होती. हा म्हणजे मोठा हिकमती, तोहमती अन् तितकाच उचापती होता. त्याला भटक्या लोकांची गाढवे विनाकारण पिटा-ळण्यात अन् ती कोंडवाड्यात घालण्यात आनंद वाटत होता.

मीरानं होत्या नव्हत्या त्या पेंढ्या डगरीवरून एक भला मोठा दगड आणून बडवल्या अन् वाळवल्या होत्या. ती हातात खरार्डी घेऊन शंकर पाटलाला नावानं शिव्या देऊन, दात-ओठ खाऊन पीळ देत होती. घायपाताला खरजीनं तावातावानं पीळ पडत असताना शंकर पाटलाविषयीही पीळ पडत चालला होता. अन् तो अजूनही टिकून होता. पण गावकीचा प्रश्न पुढं असल्यामुळं त्याला नकार देता आला नाही तरीपण काहीतरी म्हणायचं म्हणून शंकर पाटलाला सोनू म्हणाला, " तालुक्याला जनावराचा डॉक्टर लई झक्कास् काम करतो. एका मिल्टांत कैच्या लावल्या जातात अन् नस तोडली की बैल मोकळा होतो. "

" त्यापाईच काल तालुक्याला गेलो होतो. पण डॉक्टरचा तिथं पत्या नव्हत्या. कुठं फिरतीवर गेला म्हणे. कैच्या लावलेल्या जनावराला असाडी लागली की मग ते खराब होतं. " पाटलानं समजावणीच्या स्वरांत सांगितले.

सोनूने प्रथम आढेवेढे घेतले. त्याच्याजवळचा गोटा चांगला नाही हे कारण त्याने पुढे केले.

पाटलाचा गोऱ्हा आता वयात आला होता. माजी आला होता. पळताना धापा टाकीत होता. श्वास सोडीत होता. त्याला बडवायलाच-पाहिजे होते. हो ना हो करता करता सोनू तयार झाला. सोनूनं लोणी पैदा केलं. पोरीच्या हातून हळद वाण्याच्या दुकानातून मागवून घेतली. अडगळीतून गोटा काढला. माळ्यावरून लाकडाचा ठोकळा खाली ढकलला. गड्याच्या हाती गोऱ्हा बडवायचं काम सोपवून, ग्रामपंचायतीच्या मिटिंगला पाटील गेले. गड्यानं व सोनूनं गोऱ्हा आडवा पाडला. नालबंद बांधतो त्यागत त्याचे पाय बांधले व डोके धरण्याचं काम गड्यानं केलं व रात्री मुक्कामाला आलेल्या सोनूच्या पोरानं शेपटीकडचा भाग सांभाळला. सोनूनं हळद व लोणी बडवायच्या जागी चांगले चोळले. शिरा लाकडाच्या ठोकळ्यावर ठेवल्या अन् शिरावर हळूहळू दगडाचा गोटा हाणू लागला. पण गड्यानं हे पाहताच त्याच्या अंगावर शहारे आले. कसनाई आली. तोच त्यानं आपण होऊन स्वतःचं मुस्कट दुसरीकडं फिरवलं. आता सोनूचं आणि त्याच्या पोराचं काय ते काम उरले होते ! सोनू मात्र पुनःपुन्हा लोणी व हळद चोळीत होता. रगडीत होता. ठोकळ्यावर ठेवलेल्या शिरा हलक्या हातानं बडवीत होता. अर्धा एक घटका असं केल्यावर बैलाला मोकळं सोडलं होतं. त्यानं एकदम पाय झटकले. त्या संकटातून मोकळा झाला. रोखलेला श्वास सोडला अन् तो ताडकन उठून उभा राहिला. थोड्याच वेळात पाटील आला. काम फत्ते झालं ह्याची खात्री त्यानं करून घेतली. त्याबद्दल मोबदला म्हणून दोन दिवसांत बाजरी त्याच्या पदरी घालणार होता.

मिरकं पळविण्याची 'फुल्ल' तयारी करता करता एकदाची यात्रा उद्यावर येऊन ठेपली. शर्यतीच्या मैदानावर माणसांचा सागर लोटणार होता. पाटलानं गड्याला लवकर झोपायला व उठायला सांगितलं होतं. गडी ठरल्याप्रमाणं लवकर

उठला. गधाडाला त्यानं हरबऱ्याचा तोबरा दिला. गोऱ्यापुढं निळा घास टाकला अन् उरलेला गधाडापुढं फेकला. हे सर्व खिडकीतून पाटील पाहत होते. ते नुकतेच झोपेतून उठले होते. त्यांनी प्रातःविधी आटोपला. दोन चार तांबे पाणी घाईघाईने अंगावर घेतले. देव्हाऱ्यातले देव दुधाने धुतले अन् कपाळाला मोठा टिळा लावला. कपडे अंगावर घातले अन् गड्याला सांगितलं " आईच्या देवळाच्या बाजूनं मोकळ्या रस्त्यानं भिरकं आण." असं सांगून ते बाहेर पडले. लोक त्यांच्या रुबाबदार फेट्याकडं टक लावून पाहत होते. उशीरा झोपेतून उठलेली माणसं पाटलाला पाहताच जोरानं मैदानाकडं धावली. पाटलानं शनी देवाचं दर्शन घेतलं अन् नजर फिरवली तर गाईच्या आखरावर पंचक्रोशीतले भिरके येऊन पडले होते. त्याच्यापुढं हिरवा घास पडला होता. ' फुल्ल ' तयारीतले गोऱ्हे दिसत होते. भिरक्याचे धनी हलवायाच्या दुकानापुढं जाऊन ताज्या आणि कडक जिलेबीची वेटोळी खात होते. चघळीत होते. उन्हं पडत चालली तसतसं एक एक भिरकं शर्यतीच्या मैदानावर गेलं. गाई आखरावर आल्या तेव्हा एकही भिरकं आखरावर नव्हतं.

सोनूनं मैदानावर शिंगाडं फुंकलं. सगळ्यांच्या नजरा तिकडे गेल्या. पाटीलही मैदानात हजर झाले. मुख्य पंचांत पाटलांचं नाव होतं.

पाटलानं तुकाकडून काठी जमिनीत गाडून घेतली. त्यावर त्यानं गुलाबी रंगाचं निशाण अडकवलं व त्या निशाणाजवळ मोठ्या दगडावर नारळ फोडले. पाच तुकडे तेथे ठेवले व एक-दोन जणांच्या हातात खोबऱ्याचे तुकडे दिले. बाकीचे दोन्ही भाग ज्या दोन्ही बाजूंना लोक बसले होते त्या बाजूंना भिरकावले. माणसांनी खोबऱ्याच्या तुकड्यांवर पालीगत झेपा घेतल्या. एकाच्या हाती ते तुकडे आले. मातीनं ते फार भरले होते. दुसऱ्या बाजूच्या माणसांची तीच गत झाली होती. पुन्हा माणसं त्यांच्या त्यांच्या जागी जाऊन बसली.

जोड्या लावणारे पंच जिथं भिरके सुटले होते तिथं गेले. जोड्या चांगल्या लावल्या. पण लोकांचे लक्ष लागेना. त्यांना शर्यत पाहावयाची होती ती पाटलांच्या गोऱ्ह्याची ! सर्वजण कुजबूज करीत होते. " अजून पाटलाचा गोऱ्हा का आला नाही ?" गर्दीतून कोणीतरी म्हणत होतं. " आल्याशिवाय राहणार नाही तो. काय फुल्ल तयारीत आहे आवंदा. त्याची अशी शर्यत पाहायला मिळणार नाही कधी तरी ! एवढ्यात झाडावर चढून बसलेल्या माणसांनी कालवा केला. शिट्या फुंकल्या.

" अरे पाटलाचा गोऱ्हा आला, भिरकं आलं." गर्दीतून सूर उसळला. त्याबरोबर माणसं एकदम उभी राहिली. गाईच्या आखराच्या बाजूनं भिरकं येताना त्यांनी पाहिलं. गोऱ्हा फुरफुरत होता. दम टाकीत होता. थोडा वेळ त्याला दम खाऊ दिला. दामू वाघाच्या भिरक्याबरोबर पाटलाच्या भिरक्याची शर्यत पंचांनी लावली. पाटील भिरक्याकडे गेले. हातात चाबूक घेतला अन् अरी न्याहाळून घेतली. त्याला चांगलीच धार लावली होती. भिरक्यावर खुद्द पाटील बसले होते. दोन्ही भिरकी

सारख्या रेपेत उभी केली होती. एका भिरक्यावर दामू वाघ तर दुसऱ्या भिरक्यावर शंकर पाटील. पाटलाचा गुलाबी रंगाचा फेटा उन्हात लांबून चमकत होता. हाकणाऱ्या धन्यांना इशारा म्हणून एक-दोन-तीन झाले. भिरके सुरू झाले. पाटलानं गोऱ्ह्याची शेपटी पिरगाळली. अरी टोचली. गधाडाला चाबकाचा फटका दिला. ज़ोरात भिरके धावू लागले. पण इतक्यात गोऱ्ह्यानं शिवाळ सांडली, कासरा तोडला अन् तो आजूबाजूच्या लोकांना तुडवीत, दम टाकीत आणि फुसफुसत गाईच्या आखराकडं धावला. माणसं तिकडे बघतच राहिली. गडी त्याला धरण्याकरिता धावत होता. एवढ्या वेळेत गोऱ्हा गाईच्या आखरात येऊन उभा राहिला होता तर दामू वाघाच्या भिरक्यानं निशाणाची हद्द ओलांडली होती. सोनू मांगानं शिंगाडं लांबच्या आवाजानं 'तू तूऽऽर तु तूरऽऽ, ' करून फुंकळं होतं. अन् ओवाळणीकरिता दामू वाघाकडं हात पसरला होता. पाटील गधाडासहित भिरकं हातात धरून येत होते. एकवार त्यांनी सोनू मांगाकडं पाहिलं. सोनूनं पाहिलं न पाहिल्यासारखं केलं अन् शिंगाडं जोरानं पुन्हा फुंकलं. पण तेवढ्या गर्दीत पाटील दातओठ खाऊन काहीतरी बडबडत होते. तोंडात म्हणत होते, " साल्या मांगट्यानं गोऱ्हा बडवण्यात कसर ठेवली. नाहीतर शेमीगोंडा आपलाच होता. "

पण हे शब्द ऐकलं न ऐकल्यासारखं करून सोनूनं विजयोन्मादाने लांबलचक 'तू तूरऽऽऽ तुतूरऽऽ ' असा आवाज काढून शिंगाडं पुन्हा फुंकलं अन् पसरलेल्या हातावर दामू वाघाकडून आठ आणे ओवाळणी घेतली. ●


# माणूस

साप्ताहिकासाठी खालील गावी एजंटस् नेमणे आहेत.
चौकशी करावी.

**जिल्हा सांगली**

**१. जत २. शिराळा**

**जिल्हा सोलापूर**

**१. सांगोला २. अक्कलकोट ३. मंगळवेढा**
**४. माढा ५. करमाळा**

# राजबंद्यांच्या सहवासात

निवेदक
श्री. नारायण भिकाजी राजगुरु

माझ्या तीस वर्षांच्या तुरुंगातील नोकरीत जसे गुन्हेगार कैद्यांशी संबंध आले तसे अनेक राजकीय कैद्यांशीही माझे जवळचे संबंध आले. काकासाहेब गाडगीळ, सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. राजेन्द्रप्रसाद, मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण, भुलाभाई देसाई, वा. ब. गोगटे, दादासाहेब मावळंकर, मणीबेन पटेल, मृदुला साराभाई, मणीलाल कोठारी, इंदूलाल याज्ञिक या आणि अशा नंतर कितीतरी नावास आलेल्या व सत्तेवर चढलेल्या पुढाऱ्यांशी माझ्या ओळखी झाल्या होत्या.

माझे स्थान फार निकृष्टही आणि उच्चही नसल्याने मला साधारणतः तुरुंगातील साऱ्या खात्यांमध्ये प्रवेश असे. त्यामुळे राजकीय कैद्यांना माझा बराच उपयोग होत असे. कित्येक पुढारी तासन् तास माझ्याशी गप्पा मारीत बसत. कै. काकासाहेब गाडगीळ, सौराष्ट्रातील मान्यवर नेते कै. मणीलाल कोठारी, कै. दादासाहेब मावळंकर, श्री. इंदूलाल याज्ञिक हे तर माझे चांगले मित्र झाले होते. डॉ. राजेंद्रबाबूंशीही माझे चांगले सख्य जमले होते.

परंतु आम्ही सरकारी नोकर. इतर कैदी कसे नियमाने वागतात आणि हे राजकीय कैदी उगाचच उद्धटपणा करतात, असे आम्हांला वाटे. अर्थात त्यांच्याबद्दल आम्हांला आदर असे. पण कधी कधी रागही येई. हे पुढे एवढ्या मोठ्या पदावर चढतील, याची कुणाला कल्पना ! त्यामुळे कधी कधी रागाच्या भरात आम्ही त्यांना वाटेल तसे बोलतही असू. अर्थात जे पुढारी आमच्याशी फटकून वागत, अशांशीच आमचे असे वर्तन असे.

राजकीय पुढाऱ्यांच्या कैदेतील अशा कितीतरी आठवणी आहेत की, ज्या सांगितल्या तर त्यांच्यावर अन्याय होईल. पण त्याचबरोबर मजेदार आणि गोड आठवणीही खूप आहेत. काकासाहेब गाडगीळांना दसऱ्याच्या दिवशी श्रीखंड पोचवून वाचून परत करावी लागेल."

**गेल्या अंकात श्री. राजगुरु यांनी कथन केलेल्या**
**' शिकारपूरच्या तुरुंगातील '**
**काही आठवणी सादर केल्या.**
**या आहेत आणखी काही आठवणी..**
**वेगळ्या धर्तीच्या....**

देणे, दादासाहेब मावळंकरांना जेवणानंतर मुखशुद्धीसाठी बदाम-पिस्ते लागत ते गुपचूपपणे मिळवून देणे अशा गोष्टी आठवल्या की अजून हसू येते. यांपैकी बरेच पुढारी तुरुंगाबाहेर आल्यावरही आवर्जून ओळख ठेवीत. दादासाहेब मावळंकर रस्त्यात दिसले की गाडी थांबवून घरी नेत. त्यांच्या पत्नीही मनापासून स्वागत करीत. काकासाहेबांनी शेवटपर्यंत ओळख ठेवली होती.

इंदूलाल याज्ञिक हा फार सच्चा माणूस. तो राजकीय पुढारी नव्हेच. तुरुंगात त्यांचे वर्तन सर्वांशी मनमिळाऊ असे. साबरमतीच्या तुरुंगात त्यांच्याशी दाट परिचय झाला. सुटल्यानंतर रस्त्यात दिसले की हात धरून घरी नेत आणि जेऊ–खाऊ घालीत. त्यांच्या घरी मी खूप पपया खाल्ल्या.

मणीलाल कोठारी तर माझे जिवाभावाचे मित्र झाले होते. काठेवाड संस्थानात त्या वेळी त्यांची लोकप्रियता फार होती. पुढे ते वारले, तेव्हा मला फार वाईट वाटले. त्यांची स्मरणशक्ती विलक्षण दांडगी.

ते काठेवाड संस्थानातले. त्यामुळे ब्रिटिश सरकार त्यांना नेहमी आपल्या मुलखात पकडले म्हणजे हद्दपार करीत असे. ते असेच एकदा साबरमती तुरुंगात आले होते. त्यांच्या हद्दपारीचा हुकूम आला होता व दुसऱ्याच दिवशी ते जाणार होते. त्याच वेळी त्यांना भेटण्यासाठी एक काठेवाडी शिष्टमंडळ आले. हद्दपारीची कुणकुण त्यांना लागली होती. मी तिथे मुख्य कारकून होतो. त्यांनी माझ्यामागे तगादा लावला, आम्हांला हद्दपारीची आज्ञा दाखवा. मी म्हटले, " मला तसा अधिकार नाही. " त्यावर, " तुम्ही निदान आम्हांला ती आज्ञा वाचून तरी दाखवा," असे त्यांनी सांगितले. मला तेही शक्य नव्हते.

तेवढ्यात मणीलाल तेथे आले. ते म्हणाले, " राजगुरू, ती आज्ञा मला वाचता येईल ना ? " मी म्हटले, " ही घ्या. तुमच्याचसाठी आहे ती. पण फक्त तुम्हांलाच

त्यांनी तो कागद भराभर एका दमात वाचून काढला. कागद माझ्याजवळ दिला आणि विचारले, " आता समोर बसलेल्या लोकांना आज्ञा काय आहे हे मी सांगितले तर चालेल ना ? " मी होकार देताच ते म्हणाले, " तर मग घ्या कागद हाती आणि मी काय सांगतो ते बरोबर आहे की नाही यावर लक्ष ठेवा. "

ते सांगू लागले आणि मी चकीतच झालो. त्या लांबलचक आज्ञापत्रकातील इंग्रजी मजकूर त्यांनी अक्षरशः शब्दन् शब्द अर्धविराम, स्वल्पविराम, पूर्णविरामासह घडाघडा पाठ म्हणून सांगितला. मी म्हणालो, " मणीलालजी, कमाल है आपकी. "

आजकालच्या काही नव्या पुढाऱ्यांना तुरुंगातील ओळखी देणे विशेष आवडत नसावे असे दिसते. पण सगळेच तसे नाही. श्री वा. ब. गोगटयांची आठवण अजूनही ताजी आहे.

श्री. गोगटे यांनी हॉट्सनवर पिस्तुल झाडून सर्वत्र खळबळ निर्माण केली. तेव्हा मी पुण्यातच होतो. पुढे बदली होऊन पाकिस्तानात (त्या वेळी सिंधमध्ये) शिकारपूर तुरुंगात गेलो. सरकारी नोकर असलो तरी देशभक्तांबद्दल, क्रांतिकारकांबद्दल आदर होताच. त्यातल्या त्यात गोगटे अगदी पुण्याचेच. त्यामुळे विशेष आस्था होती. त्यामुळे शिक्षा होऊन श्री. गोगटे जेव्हा सक्करच्या तुरुंगात आले, तेव्हा मुद्दाम त्यांना भेटायला जायचे ठरवले. आणि दोन दिवसांची सुटी काढून सक्करला गेलो.

माझी आपली एक हौस की, ज्या प्रदेशात जायचे तेथील लोकांप्रमाणे वेष करायचा. त्याप्रमाणे शिकारपूरला असताना मी अगदी पठाणाप्रमाणे सलवार, कुडता, तिरकी टोपी किंवा फेटा असा वेष करीत असे.

रजा घेऊन सक्करला गेलो आणि प्रथम तेथील चीफ जेलरला भेटलो. इकडच्या तिकडच्या गप्पा मारल्यावर त्याला सहज विचारले, " इथे पुण्याचा कुणी गोगटे आहे ना ? " जेलर माझा मित्रच होता. तो म्हणाला, " बघायचे आहे का त्याला ? मग जा आत. मी येतो थोडया वेळाने. "

त्याप्रमाणे एक शिपाई बरोबर घेऊन मी आत गेलो. वेळ सायंकाळची होती आणि दिवस उन्हाळ्याचे. उकाडा फार. त्यामुळे गोगटे आपल्या कोठडीच्या बाहेरच उभे होते. ते अगदीच तरुण आणि सडपातळ दिसत होते. मी त्यांच्याजवळ गेलो. ओळख करून दिली आणि हॉट्सन प्रकरणाच्या वेळी मी पुण्यातच होतो, असे सांगितले. मुद्दाम चौकशी केली. " काही कमीजास्त व्यवस्था, हवं नको मला सांगा. मी करीन. "

ते म्हणाले, " सर्व ठीक आहे. काही विशेष नाही. "

पण ते बिचकत आहेत हे मी ओळखले. त्यांचा विश्वास बसत नव्हता. मी

सी. आय. डी. चा माणूस माहिती काढण्यासाठी आलो असेन असे त्यांना वाटत होते.
मी ओळखले. म्हणालो, " गोगटे, तुम्ही जरा बिचकत बोलताहात. मी महाराष्ट्रीय आहे. भिऊ नका. बेलाशक बोला. "
त्यावर ते म्हणाले, " तुम्ही महाराष्ट्रीय कसे ? दिसत नाही. तुमचा पेहराव हा असा. तुम्ही मराठी मात्र चांगले बोलता ही गोष्ट खरी. "
मी म्हणालो, " जेलर आल्यावर त्यालाही विचारा. " मग ओळख पटली. मग आम्ही खूप गप्पा मारल्या. त्यानंतर पुन्हा मी तीन-चार वेळा रजा काढून त्यांना भेटण्यासाठी सक्करला जाऊन आलो.
गोगटे सुटून आल्यानंतर वकील झाले. माझी बदली होऊन मी परत येरवड्याला मुख्य कारकून म्हणून आलो होतो. कुणाचे तरी वकीलपत्र घेऊन गोगटे तुरुंगात आले होते. माझी नजर त्यांच्यावर गेली. पण मी काही त्यांना ओळखले नाही. शिकारपूरला मी त्यांना कैद्याच्या वेषातच पाहिले होते. आता त्यांची प्रकृतीही खूप सुधारली होती. पण त्यांनी मात्र पाहिल्याबरोबर मला ओळखले. हसत त्यांनी विचारले, " काय राजगुरू, ओळखलं ? "
मी खजील होऊन म्हणालो, " नाही बुवा. "
ते म्हणाले, " मी गोगटे. "
मग आम्ही दोघेही हसलो आणि गप्पा मारल्या.
दादासाहेब मावळंकरांनीदेखील शेवटपर्यंत अशीच ओळख ठेवली. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ते उच्चपदावर चढले. मी त्यांना मुद्दाम कधी जाऊन भेटलो नाही. स्वातंत्र्यापूर्वी एकदा ते येरवड्याच्या तुरुंगात अटक होऊन आले होते. माझी आणि त्यांची ओळख साबरमतीची. ते येरवड्याला आले तेव्हा मीही येरवड्यालाच होतो. पण त्यांच्या भागाशी माझा काही संबंध नव्हता, परंतु मी तिथेच असल्याचे त्यांना कसे तरी समजले. एके दिवशी सुपरिंटेंडेंटशी गप्पा मारताना त्यांनी सहज विचारले, " का हो, राजगुरू इथेच आहेत ना ? ' सुपरिंटेंडेंटने होकार दिल्यावर ते म्हणाले " मग मी त्यांच्या ऑफिसमध्ये जाऊ का भेटायला ? " त्यावर सुपरिंटेंडेंट म्हणाले, " कशाला ? त्यांनाच बोलावू या की इथे. "
त्यांनी मला बोलावणं पाठविलं. मी दिसलो तेव्हा मावळंकरांना खूपच आनंद झालेला दिसला. सुपरिंटेंडेंटलाही आमची ओळख पाहून आश्चर्य वाटले.
मृदुला साराभाईदेखील तुरुंगात अतिशय मनमोकळेपणाने वागत. आपल्या सौंदर्याचा त्यांना मुळीच गर्व नव्हता. त्या अतिशय धीटपणे वावरत. त्यामुळे आम्ही थट्टेने त्यांना ' पठाण ' म्हणत असू. त्याही खिलाडूपणे थट्टामस्करीत भाग घेत. तुरुंगात प्रवेश करताच त्यांचा आणि माझा गंमतीदार खटका उडाला. नियमाप्रमाणे तुरुंगात प्रवेश करण्यापूर्वी स्त्री-कैद्यांना अंगावरील सर्व दागिने ठेवावे लागत. त्याप्रमाणे मी मृदुलाबाईंना सांगितले. बाईंनी नकार दिला. मी म्हणालो, नियमाप्रमाणे तुम्हांला

द्यावेच लागतील. वाटल्यास तुरुंगाधिकाऱ्यास विचारा. "

मृदुलाबाई म्हणाल्या, " तुमची बायको तुरुंगात आली असती तर तुम्ही तिचं मंगळसूत्र तोडलं असतं की काय ? "

मी म्हणालो, " नक्कीच तोडलं असतं ! परंतु तुरुंगात जायच्या अगोदर तिला समजावून सांगितलं असतं की मंगळसूत्र तोडण्याची तयारी असेल तरच जा. नाहीतर नको. "

त्यावर हसत हसतच त्यांनी आपल्या बांगडया व गळयातल्या माळा काढून दिल्या.

माझ्या मनावर कायमचा कोरला गेलेला एक प्रसंग आठवला की, अजूनही अंगावर रोमांच उभे राहतात आणि त्या प्रसंगात आलेल्या व्यक्तीच्या स्मृतीपुढे माझे मस्तक नम्र होते.

आगाखान पॅलेसमध्ये महात्मा गांधी, महादेवभाई देसाई हे कैदेत होते. देशातील आणि पुण्यातील परिस्थिती त्या वेळी स्फोटक होती. आगाखान पॅलेसभोवती पोलिसांचा कडक बंदोबस्त होता. आणि अशा परिस्थितीत महादेवभाई देसाई आपल्या खोलीतच हृदयविकाराचा झटका येऊन एकाएकी निधन पावले. इन्स्पेक्टर जनरल भंडारींना प्रथम ही बातमी कळली. त्यांनी ताबडतोब येरवडा जेल सुपरिंटेंडेंटना फोन केला.

धावपळ चालू झाली. दोन-तीन डॉक्टर्स आणि वैद्यकीय उपकरणे घेऊन एक मोटर वेगाने आगाखान पॅलेसमध्ये गेली. त्यामुळे सर्वत्र कुतूहल निर्माण झाले पॅलेसचा बंदोबस्त इतका कडक होता की, आतील पोलीस-अधिकारी बाहेर येऊ शकत नसत आणि बाहेरच्या पोलिसांना व अधिकाऱ्यांना आत जाता येत नसे. त्यामुळे आत काय गडबड झाली आहे हे कुणालाच कळेना. आम्हा तुरुंगातील कर्मचाऱ्यांनाही कळेना. बाहेर अफवा उठली गांधी वारले. अनेक अफवा उठू लागल्या.

काही वेळाने सुपरिंटेंडेंट आले त्यांनी मला अंगावर झाकायला योग्य असा पांढरा खादीचा कपडा आणावयास सांगितले. तेव्हा कुठे आम्हांला नक्की कल्पना आली की कुणीतरी खरोखरच गेले आहे. पण कोण गेले आहे ते अद्यापही कळले नव्हते.

इकडे सुरक्षिततेच्या दृष्टीने महादेवभाईंना पॅलेसच्या आवारातच अग्नी देण्याचे ठरले. पण गांधी म्हणाले, " महादेवभाई हिंदू आहेत, त्यांना मंत्राग्नि दिला पाहिजे. ब्राह्मण बोलवा. "

आता पंचाईत निर्माण झाली. ब्राह्मणाला आत घेण्यासाठी दिल्लीची मंजुरी

हवी होती. त्याप्रमाणे आय. जी. पीं. नी दिल्लीला फोन लावून धावपळ करून मंजुरी मिळवली. पुढे प्रश्न पडला ब्राह्मण कोठून मिळणार ! बाहेरचा कुठलाही ब्राह्मण नेला तर बातमी फुटणार आणि गडबड होणार. गुपचुप ब्राह्मण आणण्याची जबाबदारी सुपरिटेंडेंटसाहेबांवर होती आणि ते मोठ्याच विचारात होते.

शेवटी एक युक्ती सुचली. येरवड्याच्या तुरुंगात एक मशीद आणि एक मारुतीचे देऊळ होते. देवळात सुमारे ६५ वर्षांचा एक म्हातारा ब्रह्मचारी भटजी होता. रात्री तो देवळातच झोपत असे. त्याला झोप लागल्यावर गुपचूप उचलून पोलीस व्हॅनमध्ये टाकायचे आणि पॅलेसमध्ये न्यायचे असे ठरले. तेवढ्यात माझे तुरुंगातील ऑफिस सुटले आणि संध्याकाळच्या सात-साडेसातच्या सुमारास मी घरी आलो.

तेवढ्यात श्री. विनायकराव आपटे यांच्या पत्नी आमच्या घरी आल्या.

आपटे पती-पत्नींशी माझी साबरमती तुरुंगात घरोब्याची ओळख झाली होती. त्या दोघांचीही गांधी आणि कस्तुरबा यांच्यावर निस्सीम भक्ती.

त्यांना कसला तरी सुगावा लागला असावा हे मी ओळखले. त्यांनी लगेच घाबऱ्याघुबऱ्या विचारले, " कोण गेलं आहे हो पॅलेसमध्ये ? आम्हांला वाटतं कस्तुरबा गेल्यात की काय ? "

मी म्हणालो, " कोण गेलं आहे हे नक्की माहीत नाही. पण कोणीतरी गेलं आहे एवढे मात्र खरे. प्रेतावर झाकायचं कापड मीच काढून दिलं आणि भटजी नेण्यासंबंधीचं बोलणंही आमच्याचसमोर झालं आहे. "

श्रीमती आपटे : भटजी नेणार आहेत ना ? मग सवाष्ण नको का ? नुसता ब्राह्मण काय उपयोगाचा. मी सवाष्ण म्हणून जाते. जाऊ का ? "

मी थक्क झालो. म्हणालो, " पण ते तुम्हांला कसे शक्य आहे ? " त्या म्हणाल्या, " का नाही ? मी त्या भटजीची बायको म्हणून जाते. मला फार उत्सुकता आहे तेथे जाण्याची. तुम्ही सांगा मी त्यांची बायको आहे म्हणून. "

त्यांची समजूत कशी घालावी हेच मला कळेना. मी म्हणालो " अहो, पण तो भटजी पासष्ट वर्षांचा म्हातारा आहे. तुम्ही तिशीच्या आतल्या. आणि शिवाय त्याला बायको नाही हे सर्वांना ठाऊक आहे. ... "

त्या म्हणाल्या " द्या की तुम्ही दडपून. या बाबतीत खोटं बोलायला काय हरकत आहे ? "

शेवटी मी त्यांची कशीबशी समजूत घातली. पण त्यांची श्रद्धा बघून मी थक्क झालो. स्वतःचा क्षुद्रपणा जाणवला. अशा श्रद्धेने, जिद्दीने कामे केलेली काँग्रेसमधील जुनी मंडळी आज सत्तेवर कुठेच दिसत नाहीत. दिसतात ते नवे चेहरे. ही माणसे मात्र आज वाळीत पडलेली दिसतात.

●

# आम्ही विद्यार्थी आणि आमच्या दंगली

इंदूर–ग्वाल्हेरला ठिणगी पडली.
हां हां म्हणता उत्तर भारत पेटला.
त्या क्षणापासून तो आजपावेतो
'विद्यार्थी' या विषयावर
असंख्य फुगे
हवेत सुटले
तेव्हापासून
एका विद्यार्थी हृदयाने
शेकडो विद्यार्थी-बंधूंच्या
अंत:करणात डोकावून
पाहण्याचा अविरत उद्योग केला.
तळाशी ज्या व्यथा दिसल्या
त्या नग्न सत्याच्या स्वरूपात त्याने
येथे मांडल्या आहेत.



गेल्या वीस वर्षांत भारतमातेचे चित्र कुरूप बनत चालले असताना यंदा ते आणखी थोडेसे जास्त कुरूप दिसू लागले आहे.

विद्यार्थ्यांवर कितीही अन्याय झाला, तरी त्यांनी एखादी जीप अगर बस जाळावी का, या प्रश्नाचा विचार भिन्न भिन्न दृष्टिकोनांतून करता येऊनही निश्चित उत्तर मिळणे कठीण आहे. कारण, बस ही सार्वजनिक मालमता असल्याने क्षोभाच्या सर्वोच्च बिंदूच्या वेळीही तिला धक्का पोहोचता कामा नये. पण मग विद्यार्थी ही कोणाची मालमत्ता ? का आडमुठ्या पोलिसांनी आपल्या लहरीखातर केलेल्या गोळीबारांत विद्यार्थ्यांचे बळी पडले तरी समाजाने अस्वस्थ होऊ नये ? समाजाने कोणत्या कारणाने अधिक अस्वस्थ व्हावे – निर्जीव बसच्या मोडतोडीमुळे की, कोवळचा सजीव विद्यार्थ्यांच्या बेछूट प्राणहरणाने ? ...... असे अनंत प्रश्न एकातून एक उपस्थित होतात. त्यांचे उत्तर काहीही असो, पण त्या जळलेल्या जीपच्या ज्वालांनी एक गोष्ट निश्चित साधली आहे. जीप ज्वलनाच्या निमित्ताने अनेक बुरखे फाडले गेले आहेत. आपले स्वदेशी सरकार, थोर राजकारणी नेते, शूर वृत्तपत्रे, आदरणीय प्राध्यापक मंडळी आदींच्या अंतर्मनात आम्हा विद्यार्थी-विषयी काय विचार चालले आहेत, याचे विराट दर्शन घडले आहे.

वरीलपैकी प्रत्येकाने 'आजचा विद्यार्थी' या चर्चीय–विषयाच्या निमित्ताने

मूळ केंद्र सोडून स्वहिताची अशी सारी तर्कटे केली आहेत. विद्यार्थ्यांच्या अंतःकरणास मात्र कोठेही स्पर्श केला गेलेला नाही. म्हणून तर कोणाच्याही रागालोभाची काडीमात्र पर्वा न करता आमचे ओरबाडलेले व्यथित मन उघडे करण्याचा हा प्रयत्न. समरांगणात अर्जुनालादेखील स्वजनांवर अस्त्र उगारण्यामागील वेदना सुसह्य मानाव्या लागल्या. आम्हांलाही आमच्या वेदना जाणवत आहेत. नाइलाज आहे.

## प्रत्यक्ष दंगलीविषयी थोडेसे

सारे पूर्वग्रह दूर ठेवून विचार करू या. या वणव्याची पहिली काडी ज्यांच्या हातून पेटवली गेली त्यांचा विचार जास्त महत्त्वाचा. रीतसर तक्रार घेऊन गेलेल्या विद्यार्थ्यांना ज्या पोलिसांनी मारहाण केली, त्यांना काय शासन झाले, याबद्दल समाजाने जीव तोडून विचारावयास हवे. विद्यापीठात घुसून बायकामुलांना मारहाण करण्यात आली या घटनेबद्दल सर्व वृत्तपत्रे रान का उठवीत नाहीत ? 'विद्यार्थी हिंसक बनले'; 'बस जाळली हो जाळली'; 'फूटपाथच्या विटा फोडल्या हो फोडल्या' अशा दीर्घ आरोळ्या ठोकून खाली बारीक टाइपामध्ये गोळीबाराची बातमी देणारी ही भ्याड वृत्तपत्रे सत्याची गळचेपी करीत आहेत. कोठल्याही प्रत्यक्ष गुन्ह्यापेक्षा त्यामागील हेतू जास्त महत्त्वाचा असे न्यायदेवता सांगते. याच नियमानुसार विद्यार्थ्यांना गुन्हेगार ठरविण्यापूर्वी बस जाळणे, पोलिसांवर दगडफेक करणे या घटनांपेक्षा त्यांमागील हेतूवर अधिक भर द्यावा लागेल. अधिकाऱ्यांनी रास्त तक्रारी नाकारल्यापासून शेवटच्या घटनेपर्यंत क्षणाक्षणाचा इतिहास महत्त्वाचा ठरतो. विद्यार्थ्यांच्या मनातील क्रिया–प्रक्रिया या नैसर्गिक आणि मानवी असतील तर शेवटच्या घटनेस थोडेदेखील महत्त्व राहत नाही. विकृत, दुष्ट व अमानवी हेतू सिद्ध झाला नाही तर गंभीर गुन्ह्यातूनदेखील निर्दोषीपणा न्यायमंदिरात जाहीर केला जातो. मग विद्यार्थीच त्या नियमाला का अपवाद ठरवावेत ?

पोलिसांवर दगडफेक करण्यात आणि बस जाळण्यात नेमका हेतू काय ? अन्यायी कृत्याच्या निषेधार्थ जबाबदार शिक्षकमंडळींच्या नेतृत्वाखाली विद्यार्थी जमले तर जमावबंदीचा हुकूम मोडला म्हणून ते पांगण्यासाठी लाठीमार सुरू होतो. विद्यार्थी केवळ पांगत नाहीत म्हणून मारण्यास पात्र ठरतात का ? हा प्रश्न प्रत्येकाने आपल्या सद्सदविवेकबुद्धीस विचारून पाहावा. एकदा गोळीबार–लाठीमार सुरू झाल्यावर ते हात विचलित व्हावेत आणि आपला जीव बचवावा असे वाटणे नैसर्गिक नाही का ? स्वतःचा जीव वाचवण्याची, जीव शिल्लक असेपर्यंत पराकाष्ठा करण्याचा हरेक सजीवाचा निसर्गसिद्ध हक्क आपण कसा नाकारू शकू ? ज्या पोलिसांनी या सर्व प्रसंगांना सुरुवात केली, त्यांची ज्या जीपमधून आवक होते आहे आणि म्हणून अधिकाधिक जीव मरताहेत हे पाहून त्या क्षणाचा उपाय म्हणून ती

जीप निकामी केली गेल्यास त्यात अस्वाभाविक काय आहे ? जीप जाळण्याचा हेतू धरून विद्यार्थी घराबाहेर पडले होते की, एकामागून एक घडलेल्या घटनांचा तो अपरिहार्य परिणाम होता याचा स्वच्छ दृष्टीने विचार करून मग हवे तर त्यांना दोषी धरता येईल. **जे दोषी ठरतील त्यांना कठोर शासन झालेच पाहिजे.**

विद्यार्थ्यांचा प्रश्न हा केवळ कॉलेजच्या इमारतींत जाणाऱ्या समूहाचा प्रश्न नाही. **विद्यार्थ्यांचा विचार हा तरुण मनाच्या विचारांपासून अलग करता येणार नाही.** कोणाला खरोखरच तळमळीने व स्वच्छ तर्कनिष्ठ दृष्टीने विद्यार्थ्यांचा विचार करावयाचा असेल तर त्याला देशातील सद्यःस्थितीत तरुण मनात काय चालले आहे याचा विचार करणे अपरिहार्य आहे.

रम्य भविष्यकाळाची स्वप्ने रंगविणारे, ती स्वप्ने प्रत्यक्षात उतरविण्यासाठी स्वबाहूंवर निर्भर असलेले ते तरुण मन ! पण भविष्यकाळात भरारी मारणारा हा गरुड जेव्हा वर्तमानकाळच्या जमिनीवर उतरतो तो त्याला काय दिसते ? ...भयाण अंधकार ! ...मग तो विचार करू लागतो–ह्याला जबाबदार कोण ? या थयथय नाचणाऱ्या प्रश्नचिन्हाचे त्याच्या डोक्यातील तांडव नृत्य थांबल्यानंतर त्याला एकमेव उत्तर मिळते–**मागची पिढी !** त्यांपैकी अमुक दोषी आणि दुसरे नाहीत असा भेदभाव करणे अशक्य आहे. ' उडदामाजी काळे गोरे...'

विपन्न अशा स्वतंत्र भारतात जन्मास आलेली आमची पिढी. जसे तिला कळते आहे तसे त्या पिढीने काय पाहिलं ?––**एका बाजूस स्वार्थी, मदांध, निर्बुद्ध, निर्दय अशा पाशवी शक्ती आणि दुसऱ्या बाजूस भ्याड, दुर्बल, लाचार अन् कर्तृत्वहीन वृत्ती ह्यांच्यामधील रस्सीखेच !** दुसऱ्या प्रकारच्या म्हणजे असमर्थ, भित्र्या, लाचार लोकांचे दर्शन त्याच्या घरापासून सुरू होते. पालक, शिक्षक, विरोधी पक्ष–साऱ्यांच्या बोलण्यात हातापायावरून वारे गेलेल्या रोग्याची असहाय्यता ! आणि ही पिढी म्हणे आम्हांला मार्ग दाखविणार ? मग ते तरुण मन बंड करून उठते, " अन्यायाच्या परिमार्जनासाठी एक वेळ मी अंशात्मक हिंसक बनेन पण भ्याड बनणार नाही. "

कोणीही सोम्या गोम्या उठतो नि केवळ स्वत: विद्यार्थी अगर तरुण नाही एवढ्याच सबबीवर वहकलेल्या उपदेशाचा हक्क सांगू लागतो. कधी ही माणसे सरकारच्या रूपाने तर कधी वृत्तपत्राच्या रूपाने, तर कधी परिसंवादाच्या निमित्ताने ही संधी साधतात. अनेक भिकार कल्पनांचे आपापल्या कुवतीनुसार उत्पादन केल्यानंतर शेवटी सारे एक गंभीर प्रश्न विचारतात, " हे विद्यार्थी देशाला नेणार तरी कोठे ? "

**––" तुम्ही जेथे नेले तेथे तर निश्चितच नाही––"** एवढेच त्या प्रश्नाचे उत्तर देता येईल. देश केवळ तुमचा आहे आणि आमचा नाही का ? तुमची तर जीवनाची संध्याकाळ आहे. कशीही परिस्थिती आली तरी तुम्हांला आता फारसे स्वारस्य

उरलेले नाही. याउलट आमचे सारे जीवन येथूनच पुढे फुलणार आहे. ह्याच देशात, ह्याच भूमीत तुम्ही निर्माण केलेल्या परिस्थितीत ! हा देश आम्हांला प्राणांहून प्रिय आहे, पण स्वतंत्र भारतात तयार झालेल्या बंदुकीच्या गोळीने आम्ही आमचे प्राण गमविण्यास कदापि तयार नाही. आम्ही आमचे प्राण जतन केलेच पाहिजेत. ते आमचे राष्ट्रीय कर्तव्य ठरते. कारण, तरुण हाच राष्ट्राचा प्राण आहे. या परम प्रिय देशावर तुम्ही पाडलेली काळी छाया दूर सारून चैतन्याचा नवा प्रकाश आणण्यासाठी आम्हांला कटिबद्ध झाले पाहिजे. काम फार कठीण आहे, म्हणून आम्ही थोडे भांबावलेले आहोत. कदाचित किंचितसे विथरलेलेसुद्धा ! पण म्हणून तुम्हांला परिषदा आणि मेळावे भरवून भरपेट मेजवान्यांनंतर सुस्त मनाने आमच्यावर आणखी नवीन काय प्रयोग करावे याची योजना तयार करावयाचा हक्क पोहोचत नाही.

विद्यार्थ्यांच्या ज्या दंगली झाल्या त्यांतून सरकार, राजकारणी ते आणि स्वत:ला विचारवंत म्हणवणारे उपदेशवंत यांना शिकण्यासारखे खूप आहे. भोळा सांब आता शहाणा झाला आहे. त्याने तिसरा नेत्र उघडला आहे. त्याच्या जीवनाशी आता खेळ खेळू नका. आमच्यावर भाष्ये करण्याचा मोह आवरत नसेल तर प्रथम आपापली डबकी सोडून आमच्यात येऊन बसा. तरुण बनण्याचा प्रयत्न करा. निदान वृद्धत्वाला रजा द्या. त्यानंतर तुमच्या ओठी जे शब्द उमटतील ते आतापेक्षा निश्चित वेगळे असतील.

## आपले सरकार

आपल्या सरकारविषयी खरे म्हणजे काहीच बोलू नये हेच ठीक. पण आमच्याविषयी फार काळजी वाटत असल्याचे ढोंग ते सातत्याने करीत आहे; म्हणून त्याचा विचार करणे प्राप्त आहे. वास्तविक, या सरकारला अगदी सामान्य प्रश्नसुद्धा पेलत नाहीत, तेथे विद्यार्थ्यांच्या समस्येइतकी व्यापक समस्या त्याला झेपेल असे मानणे चूक आहे. या सरकारने सर्व इन्स्पेक्टर्स जनरलसची दिल्लीत बैठक बोलाविली. वास्तविक, दंगलीचे मूळ कारण हेच लोक असल्याने त्यांना ताकीद देण्यासाठी बोलावून घेणे आवश्यक होते. पण उलट, त्यांच्याकडून विद्यार्थ्यांचा प्रश्न समजावून घेण्यात आला. विद्यार्थी आणि तरुणांच्या भावना समजावून घेण्याची खरोखरी इच्छा असती तर पू. बापूजींच्या वारसदारांपै ी एकजण तरी प्रत्यक्ष दंगलीच्या जागी विद्यार्थ्यांशी बोलला असता. परंतु त्या वेळी उलट एक पोलादी मंत्री विमानतळावरूनच चक्क पळून गेला. हे राज्य आहे दलालांचे ! म्हणून दलालांमार्फत सरकार आपल्या भावना समजावून घेणार. हे सरकार या सुलतानांना जवळ बोलावून आपल्या घाबरलेल्या मन:स्थितीत दिलासा मागत असावे. त्यांनीदेखील सरकारला सांगितले असावे–"तुम्ही काही घाबरू नका. तुम्हांला यंदापण परत आणण्याची

आम्हांला सुपारी द्या. आम्ही फक्त विद्यार्थ्यांनाच चिरडण्यास समर्थ आहोत असे नव्हे तर तुमच्या विरोधकांनाही त्या निमित्ताने आम्ही चिरडून टाकू." असले दुबळे भ्रष्ट सरकार आणि मस्तवाल पोलीस हे नेहमी परस्परांच्या हितांस पोषकच ठरतात असे जगाचा इतिहास सांगतो. खरे म्हणजे भारत स्वतंत्र झाल्याबरोबर पहिली कोणती गोष्ट घडावयास हवी होती तर ती ही की, सुभाषबाबूंच्या आझाद हिंद सेनेच्या रक्ताने बरबटलेले आपले भाडोत्री सैन्य, वंदेमातरम् म्हणणारांवर लाठी चालविणारे गुलामी पोलीस आणि जनतेच्या पिळवणुकीची सवय हाडीमांसी खिळलेले आपले शासन यांना पारतंत्र्य जाऊन जनतेचे राज्य आले म्हणजे नेमका काय बदल झाला याची स्पष्ट समज द्यावयास हवी होती. आज वीस वर्षांनंतरही ते जुनाच वारसा पुढे चालवीत आहेत.

आपल्या पूजनीय महामंत्री वक्तव्य करतात—"विद्यार्थ्यांचा प्रश्न न्याय्य आहे. हे मला पटलेले आहे पण त्यांनी तो रस्त्यावर सोडवू नये." म्हणजे वाद फक्त जागेच्या तपशीलाचा आहे. पण महामंत्र्यांनीच सांगावे की, ज्यांनी तो प्रश्न सोडवावयाचा त्यांची आणि प्रश्नवाल्यांची गाठ रस्त्याशिवाय दुसऱ्या कोठे पडते ? राष्ट्रनेते आपली कुंपणे तोडून कधी विद्यार्थ्यांत जाऊन मिसळले आहेत की त्यांच्या आलिशान महालांचे दरवाजे विद्यार्थ्यांना कधी खुले झाले आहेत ? आज आम्ही तरुण, सुकलेल्या आकांक्षा आणि थिजलेली स्वप्ने घेऊन भटकत आहोत. गोळीबाराची चौकशी होईल न होईल. पण देशातले तारुण्य मारून टाकले हा सत्ताधाऱ्यांचा सर्वांत भयंकर गुन्हा आहे.

## आमचे उपदेशक

सगळ्या विचारवंतांचा एकच एक आवडता शोध : सर्व दंगलींचे एकमेव कारण म्हणजे विरोधी पक्ष ! वास्तविक, हे विधान इतके ढोंगी नि हास्यास्पद आहे की त्यावर केवळ एक मूक स्मित करणेच योग्य ठरेल. पण त्यामुळे अप्रत्यक्षरीत्या आणखी एका असत्याचा प्रचार होत असल्याने त्याची दखल घेणे आवश्यक ठरते. तेच तेच असत्य सातत्याने कानांवर आदळल्याने खुद्द विरोधी पक्षांचादेखील तसाच गोड गैरसमज होण्याची दाट शक्यता आहे. तेव्हा इतरांबद्दल काय बोलावे ? विरोधी पक्षांमध्ये तरुण मनाला आकर्षून घेण्याइतके जबरदस्त नेतृत्व असल्याचा आभास यातून निर्माण होतो. ते जर सत्य असते तर आज देशाचे चित्र निराळे दिसले असते. वास्तविक, विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय ही इतकी व्यापक समस्या आहे की, पालक, शिक्षक, वृत्तपत्रे आणि झाडून साऱ्या विरोधी पक्षांनी एकत्र येऊन जनतेचे आंदोलन उभारावयास हवे. पण काही पक्षांना गोवधबंदी हा जीवनाचा अंतिम लढा देण्याइतका महत्त्वाचा विषय वाटतो; काहींना व्हिएटनाम हा भारतीयांचा ज्वलंत प्रश्न वाटतो, तर काहींना दुसऱ्या एका विरोधी पक्षाचे अस्तित्व

नष्ट करण्याकरिताच आपले अस्तित्व आहे असे वाटते. कोणाच्याही कार्यक्रम-पत्रिकेवर विद्यार्थ्यांस स्थान नाही.

राजकारणी लोक नेहमीच पक्षीय दृष्टिकोनातून विचार करतात. म्हणून त्यांच्या विचारांकडे दुर्लक्ष केले तरी इतरांच्या बाबतींतही निराशाच पदरी पडते. पुण्यातल्या प्राध्यापकांनी वृत्तपत्रांत विचारप्रदर्शन करून आपली बौद्धिक खोली प्रकट केली आहे. एक महाशय म्हणतात, "सर्व स्थितीचे कारण म्हणजे विद्यार्थी. ते फारच भावना-प्रधान, बनले आहेत." त्यांना आपले विद्यार्थी भावनाशून्य, बोथट मनाचे हवे असावेत. म्हणजे एक तर विद्यार्थ्यांना वळणे त्यांना सोपे जात असावे आणि प्राध्यापक महाशयांविषयीचा आदर कायम राखण्याची कायमची व्यवस्था होणार असेल. विद्यार्थी भावनाप्रधान, संवेदनक्षम, जागरूक म्हणजेच जिवंत असले म्हणजे प्राध्यापकांना विचार करून वागणे भाग पडते आणि केवळ स्वतःच्या लायकीनुसार विद्यार्थ्यांकडून मान मिळतो ही खरी ठसठस असावी.

दुसरे एक प्राध्यापकमहोदय एक नूतन कल्पना प्रसवताना म्हणतात, "उत्तर प्रदेशात वसतिगृहात्मक शाळा जास्त असल्याने तेथे दंगली होतात. सबब, वसतिगृहे बंद करावीत." छान तोडगा आहे! वसतिगृहे बंद, दंगली बंद. रामराज्य मागील अंकावरून पुढे चालू. किती सोपी युक्ती! असली विधान करून वसतिगृहासारखी किमान गरजही पुरी करू न शकणाऱ्या समाजवादी सरकारवर असे पांघरूण घालणे ज्ञानदानाच्या या पवित्र क्षेत्राला निश्चितच लाजिरवाणे आहे.

जसे प्राध्यापक तशीच काही वृत्तपत्रे! विद्यार्थ्यांविषयी यांना ना आस्था, ना प्रेम. स्वहितापेक्षा यांची झेप पुढे जातच नाही. विद्यार्थ्यांना दूषण देणाऱ्या सर्वांचा असा वेगवेगळा परामर्ष घेण्याचे वास्तविक कारण नाही. या सर्व मंडळींच्या अंतः-करणात बुडाशी दडली आहे भीती!......भीती आहे सध्याचे स्थान गमा-वण्याची. युवक जर खरोखरच सामाजिक पुनर्रचनेच्या उद्योगाला लागला तर येणाऱ्या नव्या बदललेल्या परिस्थितीत आपले स्थान आतापेक्षा खाली असणार याची खात्री आहे म्हणून यांचे हे अरण्यरुदन! ज्यांना ज्यांना या दोषी समाज-व्यवस्थेमुळे लायकीपेक्षा जादा मिळते ते नेहमीच पुनर्घटनेच्या विरोधी असतात. परिवर्तनाला ते भितात. आपला भ्याडपणा लपविण्यासाठी ते उलटीसुलटी बौद्धिक कसरत करू लागतात.

सर्व परिस्थितीचा सांगोपांग अभ्यास करून आम्ही युवकांनीही विचारपूर्वक वागले पाहिजे. आमच्यामध्ये जागृती निर्माण झाली हे शुभचिन्ह असले तरी ही शक्ती योग्य प्रकारे कार्यान्वित झाली पाहिजे. क्रांती या शब्दाचा सारी माणसे धसका घेत असली तरी ते आपले पवित्र जपनाम झाले पाहिजे. क्रांती या शब्दाला उपमा फक्त रामनामाची देता येईल. ते नाव उच्चारताच सारी भुते पळून जातात. शिवाय रावणयुगावर मात करून रामराज्य स्थापणाऱ्या वानरसेनेचा हा घोष

होता. पण क्रांती म्हणजे राज्यक्रांती नव्हे. मानसिक क्रांती व्हावयास हवी. आपल्या मनावर मागच्या पिढीचा वारसा म्हणून जातीयवाद, प्रांतवाद, भ्रष्टाचार या रावणयुगाची छाया पडलेली आहे. संग्रामाची सुरुवात आपल्याच अंतःकरणापासून होते. हा संग्राम जिंकून मन मुक्त करा. या वेळी साऱ्या भारतवर्षातील तरुणांनी एकदिलाने वागले पाहिजे. राष्ट्रउत्थानासाठी सगळ्यांची इच्छाशक्ती एकवटू द्या. "धर्मसंस्थापनार्थाय..." या वचनाप्रमाणे भगवान युवकशक्तीच्या रूपाने अवतरले आहेत असे घडू द्या. भोंदू लोकांच्या बडबडीकडे दुर्लक्ष करून राजकारणासह सर्व क्षेत्रांत तरुणांनी भाग घेतला पाहिजे. सगळ्या क्षेत्रांचे तारुण्यीकरण हां हां म्हणता घडून येईल. तारुण्याचे चिन्ह म्हणजे आकाशाला कवेत घेऊ पाहणारा अमोघ उत्साह आणि अन्यायाविरुद्ध बंड ! इतिहासाने समाजाचे मालिन्य घुऊन टाकण्याची फार प्रचंड जबाबदारी आमच्या पिढीवर टाकली आहे. ज्याच्यामागून आम्ही जावे असे नेतृत्व आज अस्तित्वात नाही. पण म्हणून आम्ही थांबून चालणार नाही. आमच्यातून नेतृत्व उभे ठाकले पाहिजे. समोरच्या भयाण अंधःकारातून आपला मार्ग शोधावयाचा आहे. **हा मार्ग बसेस् आणि रेल्वे स्टेशने यांच्या ज्वालांत दिसणार नाही हे निश्चित.** जाळावयास भिता कामा नये. पण जाळावयाची ती आमची कुंपणे नि आमच्या भोवतीचे कोश ! त्यासाठी बाहूंत ताकद पाहिजे. चित्तात राष्ट्रासाठी स्वहितसमर्पणाची तयारी पाहिजे, धमन्यांतून राष्ट्रप्रेम उसळून वाहिले पाहिजे, डोळ्यांत अन्यायाविरुद्धच्या चिडीचे अंगावर फुलले पाहिजेत. याकरिता ईश्वराने आम्हांला सामर्थ्य द्यावे, आमच्या हृदयांत पुढचा मार्ग स्पष्ट दिसेल इतका प्रकाश फैलावा, सारा अंधार पळून जावा—अशीच प्रार्थना भारतीय युवक सदैव मनोमन करीत आहे.

## सत्ताधीशांनी आमच्यासाठी काय करावे असे आम्हांस वाटते ?

(१) **शिक्षणक्षेत्राचे निर्भेळ राष्ट्रीयीकरण**—समाजातील आर्थिक, वैचारिक व मानसिक विषमतेचे प्रतिबिंब नजरेत भरेल इतक्या सुस्पष्टपणे आज शिक्षणक्षेत्रात पडले आहे. एकाच पुणे नामक शहरात एस्. पी. कॉलेज आणि वाडिया कॉलेज यांत सर्वच बाबतींत दक्षिण आणि उत्तर ध्रुवाइतके अंतर आहे—मग खेड्यातील कॉलेज आणि शहरातील कॉलेज यांबद्दल तर बोलूच नये. हे अंतर ताबडतोब नष्ट झाले पाहिजे. अवनतीला गेलेल्या समाजाची छाया निदान भावी पिढीवर पाडू नका. म्हणून शाळा, कॉलेजे सध्याच्या ठिकाणाहून उठवून दूरच्या ठिकाणी न्या. स्वयंपूर्ण, स्वावलंबी विद्यार्थीनगरे वसवा. सर्व विद्यार्थ्यांचे खाणे, पिणे, राहणे समान दर्जाचे असले पाहिजे. आमच्याकरिता आठ महिने होणारा खर्च चार महिने देशाच्या विकासकार्यांत आमच्याकडून कष्ट करून भागवा. आमचा घाम मायभूमीत मिसळू द्या. शेतीच्या हंगामात सुट्या देऊन शेतीच्या कामावर पाठवा. सुट्टीमध्ये अध्या-

पकांची अभ्यासशिबिरे भरवा. इतके करूनही ज्यांच्या ज्ञानाची मोहिनी विद्यार्थ्यांवर पडत नाही त्यांना सपशेल रजा द्या. भव्य इमारती देशाला परवडत नसतील तर विद्यार्थीनगरांतील वसतिगृहे आणि ज्ञानमंदिरे झोपड्यांतून उभारा. खरे वैभव अलिशान इमारतीत नसून त्यांमधील विद्वान गुरुजन, कामसू शिष्यगण, अद्ययावत प्रयोगशाळा, प्रचंड ग्रंथसंभार यांच्यामध्ये साठवलेले असते.

पहिली काही वर्षे प्रादेशिक भाषा आणि नंतर राष्ट्रभाषा माध्यम म्हणून वापरली पाहिजे. राष्ट्रभाषेच्या सक्तीच्या वापराकरिता मधला काळ जो ठरवायचा त्याच्याकरिता आज वादंग माजू द्या, आंदोलने होऊ द्यात, आत्मदहने होऊ द्यात. पण जी कालमर्यादा ठरेल ती कायमची. पुनर्विचार होता कामा नये. देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला मिळणारे शिक्षण एकच असले पाहिजे. एक देश, एक भाषा, एक विद्या !

जे शिक्षण व्यक्तीच्या विकासासाठी आणि पर्यायाने राष्ट्राच्या प्रगतीसाठी निरुपयोगी आहे ते तावडतोब बंद झाले पाहिजे. चारित्र्य, विज्ञाननिष्ठा आणि शुद्ध विचार यांचे वारे आसेतुहिमाचल अनिर्बंधपणे वाहू द्यात.

(२) **धार्मिक शिक्षण–** सामुदायिक चिंतन आणि उपासना विद्यामंदिरातून नित्य घडली पाहिजे. उपनिषदे आणि सर्व धर्मांची मूलतत्त्वे यांत आम्हा विद्यार्थ्यांना पारंगत करून सोडा. उच्च धर्मातीत नैतिक मूल्यांवर नवसमाजाची उभारणी करावी लागणार आहे. पंचेचाळीस कोटी हृदयांवर एकच एक संस्कार करणारी नवी भगवद्‌गीता, नवे कुराण रचावे लागेल.

(३) **छात्रसेना–** (एन्. सी. सी.) सध्याची छात्रसेना म्हणजे राष्ट्रातील छात्रतेजाचे अक्षम्य विडंबन! विद्यार्थ्यांची क्षुद्र कीटकापेक्षाही जास्त अवहेलना तेथे होते. हत्याराचे आणि युद्धाचे शिक्षण तर प्रत्यक्ष शिबिरांतूनसुद्धा काटेकोरपणे दिले जात नाही. छात्रांच्या अन्नासाठी मंजूर झालेले द्रव्यदेखील गडप करण्यात येते. यासाठी हवे तेवढे पुरावे मिळतील. सात्त्विक वृत्तीचे अध्यापकदेखील ते विशिष्ट रंगाचे कपडे अंगावर चढविले की, वेगळ्याच पद्धतीने वागू लागतात. शिबिरांतील सैनिकी अधिकाऱ्यांच्या मग्रूर अरेरावी नि भ्रष्ट वागणुकीमुळे तरुण मनात सैनिकी पेशाविषयी घृणा उत्पन्न होते. दोन शत्रूंच्या उघड्या दाढेत अडकलेल्या देशात असे घडणे म्हणजे महागंभीर चूक आहे. उद्या लिहिला जाणारा निष्ठुर इतिहास ह्याला कधीही क्षमा करणार नाही.

ज्या पद्धतीने युद्ध आजमितीस प्रचलित आहे त्याचेच सर्वांगपरिपूर्ण शिक्षण प्रत्येक विद्यार्थ्यास देणे आवश्यक आहे. बाद झालेले युद्धशिक्षण घेण्यास अमोल शक्तीचा अपव्यय होत आहे.

(४) महाविद्यालयीन शिक्षण आणि लष्करी शिक्षण यांत जमीन–अस्मानाचा फरक आहे. यास्तव एकाच वेळी दोन्हीही प्रकारचे शिक्षण घेणे हास्यापद ठरते.

महाविद्यालयीन शिक्षणक्रमात लष्करी शिक्षण घुसडण्याऐवजी पदव्युत्तर सक्तीचे संपूर्ण वेळ लष्करी शिक्षण आम्हांला हवे· ज्या प्रदेशात युद्ध अंदाजित आहे त्याच प्रदेशात लष्करी शिक्षण मिळावे.

(५) ज्या प्रकारची भावी पिढी अपेक्षित आहे त्यापेक्षा थोडे वरचे आदर्श जीवन आमच्या गुरुजनांनी आमच्यासमोर नमुन्यादाखल ठेवले पाहिजे.

(६) शिक्षण संपल्याबरोबर नोकरीची हमी. त्यामुळे तरुण मनात अस्थिरता राहणार नाही. जरुरीपेक्षा अधिक मनगटे हे जसे राष्ट्राचे मर्मस्थान असते तसेच ते राष्ट्रांचे शक्तिस्थानही बनू शकते. पण तशी योजना करण्याचे बौद्धिक सामर्थ्य हवे.

(७) 'आजचे विद्यार्थी' हा विषय चघळण्यास विद्येशी संबंध तुटलेल्या वृद्धांना सक्त मनाई.

(८) सर्वच सरकारी खात्यांचे आमूलाग्र शुद्धीकरण नि बुद्धीकरण त्वरित झाले पाहिजे.

(९) युवक हत्या कोणत्याही सबबीवर गंभीर गुन्ह्यास पात्र ठरली पाहिजे.

पाश्चात्य देशात केवळ वेळ जात नाही म्हणून कुमार वयातील मंडळी वाटेल तो धांगडधिंगा घालतात. पण त्यांच्यावर गोळ्या झाडल्याचे कधी ऐकिवात नाही. उलट तो समाज असे का व्हावे म्हणून अधिकाधिक अंतर्मुख होऊन स्वतःच्या चुका शोधतो आहे. सुसंस्कृतपणाचे हे द्योतक आहे.

आपल्याकडे मात्र पोलिसांनी मनावर घेतल्याशिवाय दंगलीच होत नाहीत. त्या दंगलीतही 'विद्यार्थी-वध' ही नित्याची म्हणूनच दुर्लक्षनीय बाब होऊन बसली आहे. कोणत्या रानटी युगांत आम्ही वावरत आहोत हे यावरून स्पष्ट होते.

## सत्ताधारी कुंभकर्णाची झोप उडेपर्यंत आम्ही काय करावे ?

आम्ही जागृत झाले पाहिजे. जागरूक राहिले पाहिजे. अखिल भारतीय पातळी-वर संघटन व्हायला हवे. दहा-दहा विद्यार्थ्यांची अभ्यास-मंडळे देशभर स्थापन झाली पाहिजेत. आपल्या राष्ट्रजीवनाशी संबंधित अशा सर्व गोष्टींचा वैचारिक खल, मंथन नित्य घडले पाहिजे. प्रत्यक विद्यार्थ्याने अशांपैकी किमान एका मंडळाचे सभासद असणे हे पवित्र कर्तव्य मानले गेले पाहिजे. त्यांतून सुबुद्ध नागरिक तर तयार होतीलच पण भविष्यकाळातील समर्थ नेतृत्वही आकार घेईल. नवे वारे निर्मित करण्याचे सामर्थ्य असलेली माणसे तयार होतील.

जुन्या पिढीची पारंपारिकता, दैवाधीनता, परावलंबन, सांप्रदायित्व, जातीयता, औदासिन्य ही प्रमुख वैशिष्टचे होती. या वैशिष्टयांमुळे व्यक्ती असमर्थ राहिली. त्यामुळे व्यक्तीमधील सामाजिक संघर्षाची ताकदच नष्ट झाली. ही वैशिष्टचे हेरून आपण स्वतःमधून ती क्रमाक्रमाने झटकून टाकली पाहिजेत. विचारवंत, कर्तृत्ववान् अन् धडाडीच्या तरुणांनी त्यागाचे व्रत घेतले पाहिजे. त्याचबरोबर आपण सर्वांनी



स्वच्छ, शुद्ध, तर्कनिष्ठ विचार करण्यास शिकले पाहिजे. युवतींनी तर या बाबतीत पुढाकार घ्यावयास हवा. कारण आजच्या पिढीच्या स्फूर्तिदात्या आणि उद्याच्या पिढीच्या त्याच निर्मात्या असतात.

तेजस्वी, समर्थ, शोषणरहित, मुक्त समाजाच्या निर्मितीच्या ध्येयाने आम्ही वेडे झाले पाहिजे.

वरील ध्येयाच्या पूर्तीसाठी प्रतिज्ञाबद्ध असलेल्या तरुणांचा वर्षातून किमान एक अखिल भारतीय प्रचंड मेळावा भरवावा. त्यामधून आत्मशक्तीचा रास्त प्रत्यय येईलच. पण नव्या प्रेरणादेखील प्राप्त होतील.

वर सुचविलेल्या गोष्टी तोटक्या आहेत याची पूर्ण जाणीव आहे. पण या निमित्ताने नवविचारांचे उन्मुक्त झरे खळखळ वाहावेत एवढीच इच्छा. ●

## कुमार सप्तर्षी....

पुणे येथील 'यूथ ऑर्गनायझेशन' या संस्थेचे एक क्रियाशील सभासद. या लेखाचे लेखक.

विद्यार्थी-दंगलीसंबंधीचा हा लेख यूथ ऑर्गनायझेशनच्या सभासदांनी आपापसात वर्गणी जमवून एका विशिष्ट तिरीमिरीत प्रथम प्रसिद्ध केला. यातील सजीव विचार व तळमळ अधिक वाचकांसमोर यावी या उद्देशाने या लेखाचे येथे पुनर्मुद्रण केले आहे. या लेखात व्यक्त केलेल्या विचारांशी सुसंगत असे काही प्रत्यक्ष कार्यही 'यूथ ऑर्गनायझेशन' पुण्याच्या आसपास करीत आहे.

*★ तीन अभ्यासमंडळे.*

*★ दलित, पीडित बंधूंकरिता ज्ञानमंदिरे-(झोपडपट्टी, भवानी पेठ येथे)*

*★ 'बिग सिस्टर स्कीम'– शाळेत शिक्षण घेणाऱ्या छोटया मुलींशी संघटनेतील युवती परिचय करून घेऊन त्यांच्या शालेय जीवनातील अडचणी सोडविण्यास मदत करतात.*

*★ स्वास्थ्य केन्द्रे– वैद्यकीय महाविद्यालयाचे विद्यार्थी खेडयातील लोकांना आपल्या ज्ञानाचा फायदा करून देतात. (नांदेड, वेळू...)*

★



## माणूस प्रतिष्ठान....

सुपे येथील विहिरीचे काम वेगाने सुरू आहे.
नाताळच्या सुट्टीत एक 'श्रमसप्ताह' योजला आहे.
या सप्ताहात यूथ ऑर्गनायझेशनचे विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी होत आहेत. **– सं.**

## पुस्तके

# तेजस्वी वीरगाथेचा स्फूर्तिप्रद इतिहास

भारत आणि पाकिस्तान यांच्यामध्ये गेल्या वर्षीच्या सप्टेंबर महिन्यात झालेल्या अटीतटीच्या संग्रामाची साद्यंत हकीकत या पुस्तकात दिली आहे. वास्तविक, या विषयावर बरेच लिखाण ठिकठिकाणी येऊन गेले आहे. भारतीय सेनेच्या पराक्रमातील तेजस्वी घटनांचे बारकावे पुनःपुन्हा कौतुकाने न्याहाळले गेले आहेत. नावीन्याची नवलाई आता त्यांत उरलेली नाही. तरीही या पुस्तकाची परिणामकारकता कमी झालेली नाही, याचे गमक त्याच्या सर्वांगीण रचनेत आहे. प्रस्तुत संग्रामाची कारणचिकित्सा, त्याची काळजीपूर्वक पूर्वतयारी आणि तदनुषंगिक हालचाली यांचे सविस्तर वर्णन करून प्रत्यक्ष संग्रामातील घडामोडी बारकाईने वर्णन केलेल्या आहेत. शेवटी या साऱ्यांतून कोणता धडा घ्यावा याचाही विचार केला आहे. अशा वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून प्रस्तुत संग्रामाकडे पाहून त्याची सखोल चिकित्सा करणारे मराठीतील हे एकमेव पुस्तक असावे.

माहितीची विपुलता आणि मांडणीचा रेखीवपणा हे दोन्ही महत्त्वाचे गुण या पुस्तकाचे मोल वाढवितात. मंकेकरांच्या—आणि पर्यायाने वाळिंब्यांच्या—लेखनशैलीत भाषेची आतषबाजी नाही, वर्णनाचा थाटमाट नाही, उरी उमाळा आणणारी विवशता नाही. पण येथे अचूकपणा आहे. नेमकेपणा आहे. संक्षेपाखेरीज साक्षेप आहे. भारताच्या इतिहासातील या सोनेरी पानाला स्वतःचे कोंदण बसविण्याचा अट्टाहास केलेला नसला, तरी त्या कांचनाची दीप्ती पुरेपूर झळाळून उठेल याची

दक्षता घेतलेली आहे.

एकंदर विवेचनाची बैठक भावनेपेक्षा विचारांवर आधारलेली असल्याने वर्णनाच्या दिमाखापेक्षा विश्लेषणाच्या शुद्धतेची जास्त काळजी घेतलेली आहे. 'पार्श्वभूमी'पासून 'फलश्रुती'पर्यंत सर्वत्र हे विशुद्ध विश्लेषण जाणवते. "भारता-विरुद्ध सतत गरळ ओकण्यात आपली शक्ती खर्च करण्याचे पाकिस्तानला काय कारण आहे ? " यांसारखे मूलभूत प्रश्न उपस्थित करून लेखकाने त्यांची सांगोपांग चर्चा केलेली आहे. त्यासाठी इतिहासातील आवश्यक ते दाखले दिले आहेत. निर्दोष तर्कपद्धती आणि अचूक निष्कर्ष यांमुळे या विवेचनाला भरीवपणा आला आहे. राजकीय परिस्थितीस जबाबदार असणाऱ्या घटकांचा सूक्ष्म अभ्यास लेखकाने केलेला दिसतो. पाकिस्तानने हे युद्ध कुरापतीने ओढवून घेतलेले असले, तरी पाकिस्तानचा कुटिल डाव उघड करताना विश्लेषणांची पातळी कुठेही खाली घसरलेली दिसत नाही. कुटिल राजकारणाचा गुंता बराच शांतपणे व समतोलपणे उलगडला आहे.

प्रत्यक्ष युद्धाच्या धुमश्चक्रीचे वर्णन करतानाही लेखकाची लेखणी आवेगाने भारून गेलेली दिसत नाही. सत्याचा रेखीवपणा क्षणभरही बदलू दिला नाही. त्यामुळे मूळ प्रसंगातील जिवंत धगधगते क्षात्रतेज आपल्या खऱ्या स्वरूपात साकारले आहे. त्यावर कशाचे अवगुंठन चढलेले नाही. अर्थात हे क्षात्रतेज इतके तेजस्वी आहे, की त्यामुळे त्याची परिणामकारकता अभंगच राहते. भारतीय सेनेतील एकेका जवानाच्या शौर्याचा तपशील वाचताना आपोआपच मन थरारून उठते. अभिमानाने मोहरते.

## खरा इतिहास

तोफदल, पायदल आणि वायुदल यांच्या परिपूर्ण सहकार्यामुळे या युद्धात परस्परांच्या पराक्रमाचे सार्थक झाले. बिकट अडचणींच्या जागी पराक्रमाची शर्थ करून आपल्या पायदलाने मोऱ्याच्या जागी शत्रूच्या नाड्या आवळल्या. रण-गाड्यांच्या रणधुमाळीमध्ये अभेद्य पॅटनचे 'वॉटर्लू' करून आपल्या तोफदलाने पाकिस्तानी मिजाशीचा नक्षा उतरला. आणि भारतीय बनावटीच्या विमानांतून आपल्या वैमानिकांनी अवकाशात सैराट संचार करून शत्रुलष्कराचा कणा उद्‌ध्वस्त करून टाकला. कुशल रणधुरिणांची योजकता जवानांच्या पराक्रमाच्या पाठीशी होती; आणि अखिल राष्ट्रातील जनतेच्या उत्साहाचे, निर्धाराचे, प्रेमाचे सामर्थ्य त्याला उत्तेजन देत होते. या सर्वांमुळे शत्रूच्या कुटिल कारवायांना चोख उत्तर देऊन स्वदेशाची शान आपण राखू शकलो. या सर्वांचा साधार तपशील या पुस्तकात ग्रथित करण्यात आला आहे. हे चित्तथरारक पराक्रमावर आधारलेले 'युद्धकाव्य' नाही. भारतीय जवानांच्या तेजस्वी वीरगाथेचा हा खराखुरा 'इतिहास' आहे. तेजस्वी असल्यामुळे तो स्फूर्तिदायक बनला आहे.

या युद्धाचे वास्तव मूल्यमापन करण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. युद्धामध्ये

आणि युद्धामुळे नेमके काय घडले, आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीवर त्याचे स्वरूप काय आणि या युद्धामध्ये काय सिद्ध झाले याचा हा साक्षेपी विचार आहे. निर्णायक दृष्टीने विजय कोणाचाच झालेला नसला, तरी पाकिस्तानच्या अरेरावी अहंगंडाला त्याने नाहीसे केले आहे हे शेवटी निष्पन्न होते. भारतीय लष्कराचे आणि भारतीय जनतेच्या ऐक्य-निर्धाराचे सामर्थ्य या युद्धामुळे कसोटीला उतरले आणि अधिक झळाळून उठले हीच याची फलश्रुती. "समर्थ भारतच स्वतंत्र राहू शकतो, संपन्न होऊ शकतो ही या सातव्या पानाची शिकवण जर आपण विसरलो नाही तर आपले हे प्राचीनतम राष्ट्र खचित नवा इतिहास निर्माण करू शकेल— असंख्य सोनेरी पानांचा !!" ही ग्रंथकर्त्याची आशा मुळीच अनाठायी नाही याची ग्वाही या इतिहासावरून निश्चितच मिळते. **— निशिकांत मिरजकर**

**[ '७ वे सोनेरी पान' — लेखक दि. रा. मंकेकर — अनुवादक वि. स. वाळिंबे : केसरी प्रकाशन : पाच रुपये : पृष्ठे १४७ ].**

## □ वैविध्याने रेखाटलेली व्यक्तिचित्रे

दर सोमवारी एक सदर लिहावयाचे. ते दर्जेदार असून केव्हाही कंटाळवाणे वाटता कामा नये. असे सदर महाराष्ट्राबद्दल असल्यास मराठी वाचकांना जुने न वाटता नवीन वाटले पाहिजे. त्यातील विषय हा चोथा करून सोडलेला नसावा. एका सोमवारी सदर वाचले तर प्रत्येक सोमवारी त्या सदराची उत्सुकतेने वाट पाहावी अशी त्याची मलावण व्हावी. हे वृत्तपत्रांत—विशेषतः दैनिकांत —अघटितच. लिहिण्यात वा विषयात कुठे तरी तोचतोचपणा येण्याची शक्यता. परंतु हे 'सोमवारचे' अवघड व्रत गडकऱ्यांनी अत्यंत कसोशीने यशस्वीपणे पाळले. विषयांचे वैविध्य पाहायचे तर नवरात्रीपासून पैठणीपर्यंतची महाराष्ट्राची वैशिष्टचे त्यांनी टिपली. व्यक्तिरेखेत 'इंग्लंडमध्ये झुंजणाऱ्या-रंगो बापूजीपासून' आज तुरुंगात खितपत असलेल्या 'मोहन रानडयापर्यंत' सर्वांना रेखाटले. टिळकासारख्या सर्वज्ञात पुढाऱ्याविषयी लिहितानाही "जेथून इंग्रज मुंबईला आले, त्या समुद्रावर पहारा करण्यासाठी टिळकांना इथे उभे राहावे लागले आहे !" हे केळकरांचे वाक्य सहज लिहून त्यांनी लेख वेगळ्या पातळीवर नेला आहे.

हे सर्व लेख प्रासंगिक आहेत. वृत्तपत्रीय आहेत. त्यामुळे त्यांना निश्चित काही मर्यादा पडल्या आहेत. परंतु सर्वसामान्य जनतेला महाराष्ट्राच्या अनेक सांस्कृतिक, सामाजिक व राजकीय जडणघडणीची, व्यक्तींची ओळख योग्य प्रकारे घडवून देण्याचे कार्य हे पुस्तक निश्चित करते. श्री. गडकऱ्यांचा पूर्वकालातील समाजशास्त्र व राजकारण ह्यांचा अभ्यास व त्यांची दृष्टी ह्याला कारण आहे. **—सुरेश**

**[ असा हा महाराष्ट्र— माधव गडकरी : मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई : किं. ३ रु. ]**

# लेखकाच्या 'हट्टाला' बळी पडलेली मुलगी

प्रा. यशवंत कानिटकर

'मी जिंकलो मी हरलो ' या नाटकानंतर ज्याच्याबद्दल काही चर्चा व्हावी असं श्री. विजय तेंडुलकरांचें हे दुसरं नाटक. चर्चा होण्याचं मुख्य कारण या नाटकाचा नायक. ज्या व्यक्तीभोवती नाटकाचं कथासूत्र गुरफटल्यासारखं दिसतं ते मध्यवर्ती पात्र म्हणजे 'नाटक,' अशी ठोबळ कल्पना धरली तर या नाटकाचा नायक पन्नाशी उलटलेला एक गृहस्थ तात्या कुलकर्णी आहे, असं म्हटलं पाहिजे. हा गृहस्थही साधा-सुधा नाही तर आयुष्यभर इतरांना गंडे घालीत स्वतःचा संसार केलेला. त्या बद-मापीबद्दल एक धंदेवाईक आस्था असलेला गृहस्थ आहे. जगात मोठया संख्येनं वावरत असलेल्या मूर्ख माणसांजवळच्या लायकीपेक्षा जास्त जमलेल्या पैशाचा काही भाग लाटणं हा त्याचा Business आहे. तरीही "कुणाही गरिबाचा गळा कापायचा नाही" ही धंद्याची नेकी (Business ethics) त्यानं कसोशीनं सांभाळली आहे. त्याच्या या Business बाबतची सर्व माहिती असूनही त्याच्यासकट कुटुंबातील सर्व माणसांना सुधारण्याच्या हट्टाने सून म्हणून घरात आलेल्या मुलीची ही गोष्ट ठरावी, असे लेखकाला वाटत असावे. म्हणूनच नाटकाचे नाव आहे 'एक हट्टी मुलगी.'

पडदा उघडतो तेव्हां प्रेक्षकांना अनेक बाबा आणि महाराजांच्या फोटोंनी सज-लेली एक आश्रमवजा खोली दिसते. मग एका भोळ्या भक्ताबरोबर तात्या प्रवेश करतात. 'माऊली' नामक साप्ताहिकाकरता मदत म्हणून त्याच्याकडून पैसे उकळ-तात. कमळीवर आणि शिन्यावर (तात्यांची मुलगी आणि मुलगा) खेकळतात — मदतपेटीतील पैसे बायकोला देतात. मधूनमधून, साडेआठ वाजले तरी बाजूच्या खोलीत कडी घालून बसलेल्या मुला—सुनेबाबत चडफडाट इ. प्रकारांतच पहिला अंक संपतो. मधल्या वेळात तात्या तुरुंगात असताना Jail Vistor म्हणून काम केलेली काका बाकरे नामक प्रखर गांधीवादी व्यक्ती प्रेक्षकांचं कुतूहल जागे करून जाते तेवढंच. पण नाटकाचा पहिला अंक उभा राहतो केवळ तात्यांमुळेच. विनोदाची तल्लख जाणीव असलेला तात्या या अंकभर एकेका वाक्यागणिक विनोदाची अशी काही पखरण करतो की प्रेक्षक त्याच्या इरसालपणावरच फिदा होतात.

## थोडक्यात कथानक

नाटकातील संघर्षाला दुसऱ्या अंकात सुरुवात होते. नव्या सुनेनं 'चिंधडे' बाबाचा फोटो हलविलेला असतो. भिंतीवरील महाराजांची संख्या खूपच कमी झालेली दिसते. बायकोबरोबर तरुणपणातील काढलेला तात्यांचा एक फोटो एका खांबाला दिसतो. तात्यांना हे सहन होत नाही. बाहेरून येताच आदळआपट करतात. चिंधडेबाबाचा फोटो मूळ जागी लागलाच पाहिजे असा हट्ट धरतात. ("चांगला चालू बाबा तो"– इति तात्या). स्वतःचा, बायकोबरोबर काढलेला फोटो काढून टाकतात. "घरातील प्रत्येक माणसानं या घराचं वळण पाळलंच पाहिजे" अशी तंबी सुनेला देऊ पाहतात. हे सारं असह्य होतं तेव्हा सून त्याला नकार देते. काहीही झालं तरी वाईट वागणं आपल्याला जमणार नाही असं स्वच्छ सांगून टाकते. घरातील सर्वच माणसं चमकतात. तात्यांच्या दडपणाखाली कोमेजलेली मनं आशेनं सुनेकडे पाहू लागतात. अनुभवी तात्या परिस्थिती जोखतात आणि जाहीर करतात "सूनबाई, आजपासून घर तुझ्या ताब्यात!"

नाटकाचा तिसरा अंक सुरू होतो तेव्हा सूनबाईनं घर ताब्यात घेतलेलं असतं. बाहेरील खोलीच्या एका भागात पार्टिशन घालून ऑफिस बनलेलं दिसतं. तात्या सूनबाईचे Chief clerk-cum-manager झालेले दिसतात. लोणची, पापड, मसाले इ. घरगुती मालाचा व्यापार सुनेनं चालू केलेला दिसतो. तात्यांची बायको, मुलगा, मुलगी मसाले कुटण्यात, मालाचे पॅकिंग करण्यात खपत असतात. स्वतः सूनबाई भांडवल उभारणीसाठी अनेक शेटजींकडे दौरे काढीत असते–मालाची जाहिरात होण्यासाठी धडपडत असते. तिचा नवरा वसुली इत्यादी कामं करीत असतो (म्हणजे नेमकं काय करीत असतो हे तसं प्रेक्षकांना शेवटपर्यंत कळत नाही!) प्रयत्न करूनही माल खपत नाही. भांडवल वाढत नाही. घरातली सारी माणसं निराश होतात. सूनबाईला दोष देऊ लागतात. अखेर सूनबाईही निराश होते. सुनेच्या पराभवाच्या त्या क्षणी तात्या पुन्हा घर ताब्यात घेतात. धंदा जोरात चालेल अशी लबाड हिकमत शोधून काढतात. सर्व माणसांवर कबजा मिळवतात. सुनेचा नवरा तेवढं अखेरच्या क्षणी सांगतो, "तात्या, काही झालं तरी आम्ही दोघं आता तुमच्या हिकमतीत राहणार नाही. उद्या मी पुन्हा नोकरीचा प्रयत्न करणार आहे."

## शरद तळवलकर–यशाचे धनी

नाट्यलेखनाचा विचार करता लेखकाचं नाटक संपतं. मुख्य अपयश म्हणजे तीनही अंकांतून प्रकाशझोत केवळ तात्यांवरच पडत राहतो. ही व्यक्तिरेखा लेखकानं फार जवळून, प्रत्यक्ष पाहिल्यासारखी जिवंत रसरशीत वाटते. या उलट, हट्टी मुलीसकट इतर सर्व पात्रे ही बेतलेली वाटतात. नाट्यलेखनातील या दोषाला अधिक हातभार लागतो या भूमिका करणाऱ्या कलावंतांकडून! श्री. शरद तळवलकर यांनी उभा

केलेला तात्या म्हणजे त्यांच्या अभिनय-कौशल्याचा एक नवाच पैलू आहे. टबलावर असलेला बुद्धाचा पुतळा खाली जमिनीवर ठेवून त्याच टेबलावर तात्या शांतपणे बैठक मारतात, Incom-Tax च्या लफड्यांत अडकलेल्या एका धनिकाला गंडा घालण्यासाठी आपण गांधीजींच्या निकटवर्तीयांपैकी एक पुराणे गांधीवादी आहोत हे दाखविण्यासाठी खास कळकट आणि बावळट पोषाख करून बाहेर येतात—खास सर्वोदयी आवाजात बोलतात—तिसऱ्या अंकांत सूनबाईला पराभूत केल्यावर Advance मिळविलेले पैसे बायको—मुलांना वाटून सर्वांना खूष करतात—या सर्वच प्रसंगी श्री. तळवलकर यांनी केलेला अभिनय पाहिलाच पाहिजे. वाईट इतकंच की प्रेक्षकांना हसविण्याची चटक लागलेले तळवलकर प्रसंगी मर्कटचेष्टा करू पाहतात. थोडा वेळ का होईना—तात्यांपासून दूर जातात. फार्समधील अभिनयाचे गडद संस्कार झाल्यामुळे दिग्दर्शक श्री. आत्माराम भेंडे यांना यात काही वावगे दिसले नसावे !

## चुकून कोंडलेलं पाखरू

हट्टी मुलीच्या कामासाठी कामिनी कदम यांची निवड करण्यात हट्टी मुलगी, स्वत: कामिनीबाई आणि प्रेक्षक या सर्वांवर फारच मोठा अन्याय झाला आहे. नाटकाच्या पहिल्या अंकात, कडी घातलेल्या खोलीने हट्टी मुलीबाबतचे कुतूहल खूपच वाढवलेले असते. बऱ्याच वेळाने कडी उघडते आणि कामिनी कदम प्रवेश करतात. केसांचे फुगे कानांवरून वळवलेली, हिरवेगार नऊवारी पातळ चापूनचोपून नेसल्यामुळे मूळचेच सुडौल शरीर अधिकच रेखीव दिसत असलेली ही मुलगी पाहताच तात्यांचा निर्गुण-निराकार मुलगा दिनकर ' इतक्या सुस्थळी ' पडावा याचा प्रेक्षक हेवा करू लागतात. हे असे घडण्याचे श्रेयही तात्याच घेऊ पाहतात. ( " मुलगी पाहिली तेव्हाच दिन्याला म्हटलं, काहीतरी कळून तिकडून नाही म्हणण्याआधीच दे बार उडवून, पुढचं पुढं पाहू—" इति तात्या ) एक लाजाळू—सरळ मनाची मुलगी साकार करण्यासाठी कामिनीबाई धडपडतात—पण बालपणीची एक आठवण सांगताना स्टेजवर समोर येतात आणि पापण्यांची अकारण फडफड करतात—इतकी की सुजाण प्रेक्षक खूणगाठ बांधतो – ' अरे हे गिर्रेबाज पाखरू आहे—सोज्वळतेच्या पिंजऱ्यात कोंडण्याच्या इतरांचा हट्ट आहे इतकंच ! ' जिथून नाटकाच्या संघर्षबिंदूला सुरुवात व्हायची त्याआधीच नाटक कोसळू लागतं. लेखकाला अभिप्रेत असलेली संवादातून प्रतीत होणारी मुलगी ती ही नव्हे असं शेवटपर्यंत वाटतच राहतं. सौ. विजया मेहता यांच्यासारख्या एखाद्या कलावंताने हीच भूमिका केली असती तर सबंध नाटकाने किती वेगळी पातळी गाठली असती असा विचार तर अनेकदा मनात येतो. कामिनीबाई यांचा या भूमिकेबाबतचा समज खूपच तोटका वाटतो. त्यातून जी थोडीफार मूर्ती त्या दुसऱ्या अंकाअखेरपर्यंत साकार करतात, ती तिसऱ्या अंकात साफ कोसळून पडते—लेखकामुळे ! सासऱ्याला फसवणुकी)पासून परावृत्त करू पाह-

णारी ही मुलगी तिसऱ्या अंकात, स्वतःचा माल खपविण्यासाठी, सासऱ्याची मदत घेऊन चक्क थापा मारू लागते. ही थापेबाजी चालू असताना, कदाचित आता धंद्याला भांडवल मिळेल या आशेने सुनेच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव आणि गिऱ्हाइकाला गंडा घालताना, अगोदरच्या अंकांतून तात्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले भाव अगदी सारखे! नाटकाचा तिसरा अंक खऱ्या अर्थी उभाच राहत नाही. तो उभा केलाच पाहिजे म्हणून पापड–मसाल्यांचा आधार! तिसऱ्या अंकाच्या शेवटी "मी आता नोकरी करणार" हे म्हणणारा दिनकर दुसऱ्या अंकाच्या शेवटीच तसे म्हणतो तर ते मराठी व्रीदाला धरून झाले असते. नाटक दोन अंकांत संपले असते इतकेच. तरीही हा तिसरा अंकही अखेर तात्याच सावरतो. मॅनेजरच्या भूमिकेत जवळजवळ गप्प बसलेले असताना तात्या मधूनमधून जे मोजकेच बोलतात त्याने प्रेक्षकांना दिलासा मिळत राहतो. चौफेर टोलेबाजी करून गेलेला एखादा फलंदाज क्षेत्ररक्षणासाठी सीमारेषेवर आळसात उभा असला तरी प्रेक्षकांचे लक्ष स्वतःकडे गुंतवून ठेवतो त्यातलाच हा प्रकार!

गांधीवादी काका बाकरेंची भूमिका श्री. दत्ता भट कसोशीने करतात. पण इथेही लेखकाचे अपयश त्यांना आड येते. आपली भाची तात्याची सून होणार हे कळताच तिला सावध करण्यासाठी काका धडपडत तात्याकडे येतात. त्याची गाठ पडते आधी तात्यांशी. सुनेला इतक्यातच काही सांगणार नाही असं भरघोस आश्वासन ते तात्यांना देतात पण भाची बाहेर येताच तिला प्रश्न विचारतात, "सासरी तू सुखी आहेस ना? स्पष्ट सांग, सासूसासरे इत्यादी माणसं जशी असावीत तशीच आहेत ना?" परक्याच्या घरात त्याच्यादेखत त्याच्या सुनेला असे प्रश्न कुणी विचारील का? विचारले गेलेच तर "मी सुखी आहे" असं तोंडदेखलं उत्तरच सुनेकडून मिळेल की नाही? ज्या अट्टाहासाने हे प्रश्न काका बाकरे विचारतात त्यावरून त्या व्यक्तीच्या एकूण बुद्धिमत्तेबद्दल खूपच संशय निर्माण होतो. दोन मिनिटांपूर्वी तात्यांना आश्वासन देऊन ते लगेच मोडण्याचे कसब गांधीवादी निष्ठेचाही निकाल लावून जाते. या पुढचा काका बाकरेही 'भंकस' वाटत राहतो.

दिनकरची भूमिका करणारे श्री. उदयराज यांचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. तात्यांच्या हुकूमशाहीखाली पूर्णपणे कोंडमारा झालेल्या, आत्मविश्वास गमावलेल्या असहाय्य मुलाचे चित्र ते फार यथार्थपणे सादर करतात. इतके की नाटकाच्या अखेरीस "मी नोकरी करणार" हे म्हणतेवेळचा त्यांचा आवेशही उसना–उथळ वाटतो. एकापरीने श्री. उदयराज यांचा हा गौरवच आहे. कारण लेखकाने Public करिता लादलेला हा आवेश त्या व्यक्तिरेखेशी पूर्णपणे विसंगत आहे.

एखाददोन फार्सिकल प्रसंग सोडले तर श्री. आत्माराम भेंडे यांचं अस्तित्व कुठेही जाणवत नाही. तात्याच्या बेरकेपणामुळे दिग्दर्शकही बचावला आहे इतकंच!

नाटक तात्या कुलकर्णींचं–पण नाव हट्टी मुलीचं असा हा कात्रजचा घाट आहे. ●

# भिंतीच्या तुकड्या

**सुधाकर राजे**

## □ मुंगीच्या पावलाने चालणारी मुंगी

परवा छोटयासाठी बाजारातून इसापनीति घेऊन आलो. हा बेटा इसाप इरसाल थापेबाज. त्याची सिंह अन् उंदराची गोष्ट घ्या. पंजात सापडलेल्या उंदराला सिंहाने सोडून दिले हे एक वेळ मान्य, पण जाळयात सापडलेल्या सिंहाला कोणता उंदीर सोडवील? इसापनीतीतल्या उंदराने सिंहाचे जाळे कुरतंडून सिंहाची सुटका केली, पण खरा उंदीर काय करील माहीत आहे?– तो ती सुवर्णसंधी साधून सिंहाच्या शेपटीचे चावे घेत बसेल.

मुंगी अन् कबुतराच्या गोष्टीत तीच थापेबाजी. ही गोष्ट खरी कशी लिहायला हवी होती? अशी––

एकदा एक मुंगी नदीकाठी फिरायला गेली. वास्तविक, मुंग्या अतिशय उद्योगी असतात म्हणे. तेव्हा या मुंगीला फिरायला जायला वेळ मिळाला हे नवलच. बहुतेक तिने सिकनोट पाठवून दांडी मारली असावी. कारण, ती गेली नसती तर पुढचे सर्व काही घडले नसते– अन् मग इसापनीती कशी तयार झाली असती?

असो. सांगायचे काय, ही मुंगी नदीकाठी फिरायला गेली आणि फिरता फिरता पाण्याच्या अगदी जवळ गेली. पुढं कसं झालं कुणास ठाऊक, ( – 'माणूस'चा बातमीदार म्हणतो तिने हाय-हिल सँडल प्रथमच घातले होते ) पण ती अचानक पाण्यात पडली.

तसे पाहिले तर मुंग्या पाण्यावर तरंगतात, तेव्हा या मुंगीला काठाला जायचे तितके कठीण नव्हते. पण इसापचे म्हणणे आहे की ही मुंगी बुडायला लागली. तिला म्हणे पोहता येत नव्हते, कारण ती भारतीय मुंगी होती, व अमेरिकन मुंग्यांच्या प्रमाणे तिच्या वारुळात खासगी पोहण्याचा तलाव नव्हता. बाईच्या जातीला अनुसरून तिचे सगळे अवसान ऐन वेळी गळाले व ती ओरडली, "धावा हो धावा! मी बुडतेय्......"

आता जगातल्या निरुद्योगी शास्त्रज्ञांनी निरनिराळ्या पशुपक्ष्यांचे आवाज टेप-रेकॉर्ड करून ठेवले आहेत, इतकेच काय समुद्रातल्या माशांच्या आवाजची देखील ध्वनिमुद्रिका आहे, म्हणतात. पण आपण मुंगीचा आवाज ऐकला अहे. असे म्हणणारा शास्त्रज्ञ पृथ्वीच्या पाठीवर आहे काय ? नसू दे. तो नसला तरी या मुंगीची आर्त हाक जवळच एका झाडाच्या फांदीवर बसलेल्या कबूतराला ऐकू गेली–निदान इसाप असे म्हणतो, विश्वास ठेवा अगर ठेवू नका.

असो. कबूतराने ती हाक ऐकताच, मदतीला धावून (की उडून ?) जाण्याचे ठरविले व झाडाचे एक पान मोडून पाण्यात मुंगीच्या जवळ टाकले. त्या 'लाईफ-बोट'च्या आधारे मुंगी काठाला लागली व डोळ्यात कृतज्ञेने अश्रू आणून (हे अश्रू इसापला कुठल्या मायक्रोस्कोपमधून दिसले कुणास ठाऊक !) कबूतराला म्हणाली, " अहो, थँक्स हं गडे ! मीही प्रसंग पडेल तेव्हा तुमच्या उपयोगी पडेन. "

" कसचे, कसचे ! " कबूतर हिंदी सिनेमातल्या हिरोप्रमाणे विनयाने म्हणाले व त्याने बोईंग ७०७ च्या थाटात तेथून भरारी घेतली.

काही दिवसांनी मुंगी पुन: त्याच ठिकाणी फिरायला गेली ( – उंच टाचांचे सँडल न घालता ) आणि आपल्या दोस्तासाठी इकडे तिकडे पाहू लागली. तेव्हा तिला दिसले की कबूतर एका झाडावर बसले आहे व एक शिकारी आपल्या बंदुकीने त्यावर नेम धरीत आहे.

" अयाई ! " हे करुण दृश्य पाहून मुंगी दु:खातिरेकाने किंचाळली. पण लाउड-स्पीकरच्या अभावी ती किंकाळी शिकाऱ्याच्या मानवी कर्णरन्ध्रांना भेदून जाऊ शकली नाही. तेव्हा मुंगी म्हणाली, " मला माझ्या बॉय-फ्रेंडला वाचविलेच पाहिजे. मी जर ऐन वेळी शिकाऱ्याच्या पायाला चावले तर त्याचा नेम चुकेल व माझा मित्र सुख-रूपपणे उडून जाऊ शकेल.

हा प्लॅन ऑफ् ॲक्शन मनात ठरवून मुंगीने ताबडतोब शिकाऱ्याच्या दिशेने पद-यात्रा आरंभली. मजल दरमजल करीत तिची पायपीट चालू होती.– पण हाय ! ती शिकाऱ्यापर्यंत पोचण्याच्या आधीच त्याने बार उडविला-व कबूतर खाली पाडले.

तरीही केवळ मित्रप्रेमाने प्रेरित होऊन मुंगीने त्याच्या पायाला चावा घेतला. पण झाले काय ? एक इरसाल शिवी हासडून शिकाऱ्याने मुंगीला जागच्या जागी चिरडून टाकले.

तात्पर्य : मुंगीच्या पावलाने मुंगीनेही चालू नये.

# दिलने फिर याद किया

## भावनोत्कट कथाविषयाचा विचका

'दिलने फिर याद किया'मध्ये असा एकही प्रसंग नाही की जो केवळ 'दिलने फिर याद किया'मध्येच आहे. म्हणजे असे की यांतील प्रत्येक प्रसंग हा ओळखीचा वाटतो. पूर्वी कोठे तरी, केव्हा तरी, थोडचा वेगळचा परिस्थितीत, घडलेला आहे असे दिसते. पूर्वी होऊन गेलेल्या हिंदी चित्रपटांतील प्रसंग निवडले, धर्मेंद्र, नूतन (दोघांच्याही दुहेरी भूमिका) रेहमान व जीवन यांच्यावर चित्रित केले, ते सर्व एकत्र, साधारण संगती पाहून जोडले व 'दिलने फिर' तयार झाला. तिघा रावळ बंधूंनी (निर्माते बी. एल्., दिग्दर्शक सी. एल्. व लेखक जी. एल्.) कामगिरी केली ती हीच.

तरीही पिक्चर संपल्यावर कोठेतरी याद राहून जाते ती यातील कथाविषयाची. दोघा मित्रांतील अतूट स्नेहबंधांवर नियतीने आणलेला ताण हे मूळ कथासूत्र. पण खरा विकास शेवटच्या ⅓ भागातच. एकूण १५ पैकी पहिली १० रिळे अगदी रूटीन वळणाने उलगडत जातात. नायकाच्या प्रेयसीवरील खलनायकाचा डोळा, तिला आपल्या प्रेमपाशात ओढण्यासाठी त्याच्या नाना लीला, ती वश होत नाही असे पाहून सुरू केलेली जबरदस्ती सगळे कसे अगदी हिंदी चित्रपटात अटळ असल्यासारखे घडत जाते.

अशोक व अमजद हे दोघे जानी दोस्त. दोघांच्या प्रेयसी दिसायला सारख्या. डाव्या गालावरच्या तिळाचा फरक तेवढा त्यांचे हे सारखेपण या दोघा मित्रांना मात्र माहीत नसते. खलनायकाच्या हातातून निसटलेला अशोक व त्याची प्रेयसी आशू, अमजद व त्याची प्रेयसी शबनम यांच्या लग्नाला म्हणून ट्रेनने येण्यास निघतात. दुर्दैवाने ट्रेनला भीषण अपघात होतो. आशू मरते व अशोक जबर जखमी होतो. अमजद त्याचा मित्रच. शुद्धीवर येताच अशोकला आशूच्या मृत्यूचा धक्का बसू नये म्हणून अमजद आपली बायको शबनम हिला आशूच्या रूपात अशोकच्या सेवेस ठेवतो. शबनम पेचात येते. तिच्या भावनांचा विलक्षण कोंडमारा होतो. नवरा समोर असताना त्याच्या मित्रावर प्रेम करायचे ही कल्पनाच तिच्या साध्वी मनाला रुचत नाही. तिला आशू समजणारा अशोक मात्र तिच्याशी मोकळेपणी प्रेमलीला करू पाहतो. अमजद व आशू यांच्यामध्ये गैरसंबंध असल्याचा अशोकला संशय येतो. मित्रसंबंध विलक्षण ताणतात. शेवटी सर्व खुलासा

होतो. पण पिक्चरचा शेवट सुविहित होण्यासाठी अशोकची उपस्थिती खटकते. म्हणून खलनायक भगत पुन्हा अवतीर्ण होतो. मारामारीत अशोकला गोळी लागून तो आशूला जन्मोजन्मीची साथ देण्यासाठी जातो.

अशी आहे अमर्याद मित्रप्रेमाची–' दिलने फिर–'ची कहाणी. चित्रपटसा शेवटी शेवटी जरा धार येते. त्या वेळचे संवादही श्री. जी. एल्. रावळ यांनी वेधक लिहिले आहेत. पण आधी प्रेक्षकांना हसविण्यासाठी त्यांनी वाह्यात्कळ-पणाचा आश्रय घेतला आहे. एका प्रसंगात आशूचे प्रणयाराधन करीत असताना अशोक म्हणतो : " जरा घुंघट तो निकालो। घुंघट नहीं निकालोगी तो बच्चे कैसे होंगे ?" या एका व नंतर येणाऱ्या अशा बऱ्याच वाक्यांनी त्या त्या प्रसंगांतील गोडीच घालविली आहे.

तिघाही रावळबंधूंपैकी कोणाच्याही प्रतिभेचा स्वतंत्र आविष्कार या चित्र-पटात झालेला दिसत नाही. त्यांतल्या, त्यात चातुर्य दिसते ते दिग्दर्शक रावळ यांचेच. चिक्कार वाव असूनही पिक्चरला त्यांनी फारसा मद्रासी टच आणला नाही. शेवटचे भावनिक उत्कटतेचे प्रसंग त्यांनी बरे हाताळले आहेत.

नूतनची प्रमुख व पुन्हा दुहेरी भूमिका फारसी उंची गाठू शकत नाही. आशू म्हणून खेडवळ प्रेमिकेत तिने बरीच सहजता दाखविली आहे. विशेषतः, त्यातील एक–दोन विनोदी प्रसंगांमध्ये तिने गंमत उडवून दिली आहे. पण शबनम म्हणून येणारा पेच उलगडताना तिला फारसा चांगला भावना-विष्कार जमला नाही. ती तिथेच कमी वाटते. याचे एक कारण असे की तिच्यातील मानसिक संघर्षाची खरी वेळ येते, तेव्हाच चित्रपटाची अखेरची धाव चालू झालेली असते. मांडलेल्या अनेक गोष्टींचा निकाल दिग्दर्शकाला लावायचा असतो व त्यामध्ये शबनमच्या संघर्षाला फुरसत असते कुठे ?

धर्मेन्द्र बरा दिसतो. दुसऱ्या भूमिकेत खलनायक भगतचा रखवालदार म्हणून टुणटुणशी जमविलेले त्याचे सूत मजा आणते. रेहमानला नवविवाहित म्हणून पाहावयाचे ही डोळ्यांवर फारच जबरदस्ती होते. त्याचे सुटलेले पोट बुशकोटात फारच जाणवते. त्याने काम ठाकठीक केलंय. बाकी जीवन, सुंदर, रणबीर वगैरे मंडळी आहेत. आशूचा माऊ म्हणून आय. एस. जोहर पडद्यावर येऊन जातो. खलनायक भगतची टिंगल करण्यासाठी त्याचा बाईच्या वेषात उपयोग केलाय.

ईस्टमन रंगातील छायाचित्रण, नूतन, धर्मेन्द्र, रेहमान यांच्यासारखे वाकबगार नट असूनही ' दिलने फिर–' च्या भावनोत्कट विषयाचा विचकाच उडाला आहे. कारण, कोणती गोष्ट किती प्रमाणात घालावयाची याचे रावळ कंपनीचे गणितच चुकले आहे. मध्यंतरापर्यंत कथा वेगाने पुढे जात नाही व मग शेवटी सगळी धांदल उडाली आहे. ●

# राशी भविष्य : श्री. गो. जोशी : सायनाचार्य, नाशिक

## जानेवारी १९६७

मेष :— या महिन्यात भाग्यस्थानामधून व दशमामधून अनेक ग्रहांचा जथा संचरणार आहे. अशी ग्रहस्थिती वर्षातून क्वचित वेळी घडत असते. म्हणूनच हा काल आपणांस प्रकर्षाने जाणवेल.

गतिमान चारित्र्याचा हा महिना म्हणून लक्षात राहील. निवडणुकीचे पडघम याच काली वाजू लागतील. हिरीरीने अनेक कार्यक्रमांत भाग घ्यावा लागेल. दूर-दूरच्या दौऱ्यावर निघावे लागेल. अनेक सभासंमेलने गाजवावी लागतील. असंख्य कामांचे डोंगर हातावेगळे करावे लागतील. ही बाजू बाह्य कार्यक्रमाची. अंतर्गत, कौटुंबिक कार्यक्रमही गाजून जातील. मंगलकार्ये थाटात पार पडतील. सांसारिक वातावरणात उत्साह ओसंडू लागेल. या वेळचा रवि-हर्षल त्रिकोण (दि. १५ जा.) अनन्यसाधारण लोकोत्तर घटना घडवून आणील.

दि. ३ ते ६, १० ते १७, २३ ते २७ संस्मरणीय दिवस होत.

वृषभ :— अष्टमातील र. शु. चे अस्तित्व आता क्षणकाल आहे. तुमच्या भाग्यस्थानी प्रवेश करण्याची त्यांना घाई झालेली आहे.

प्रामुख्याने दुसऱ्या पंधरवड्यात अनन्यसाधारण प्रगतीच्या घटना भराभर घडून याव्यात. तुमच्या अंगचे सुप्त कर्तृत्व याच वेळी प्रकटेल. तुमच्यातील अभिजात कलावृत्तीचे याच वेळी दर्शन घडेल.

तुमच्या धारदार प्रभावी वक्तृत्वामुळे सारा समाज ढवळून निघल. रवि-हर्षल त्रिकोणापासून अनेक आश्चर्यकारक क्रान्तिपूर्ण घटना घडून यायला लागतील. दि. २२ ला मंगळाचा षष्ठस्थानी प्रवेश घडताच सारे विरोधक तोंड काळे करून पसार होतील. जानेवारीचा अखेरचा आठवडा तर अत्युत्तम कालखंड म्हणून तुमच्या कित्येक दिवस लक्षात राहील.

दि. २ ते ६, ११ ते १७, २३ ते २९ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा.

मिथुन :— चौथ्या मंगळाच्या खडतर कारकीर्दीतही तुम्ही आपले आसन टिकवून आहात यातच आपल्या असामान्य धैर्याचे व निष्ठेचे दर्शन घडते.

आता तोच मंगळ तुमच्याशी आत्मीयतेने वागू लागेल. त्याचे कर्तृत्व आताच तुमच्या प्रत्ययास यायला लागल. आजवरच्या तुमच्या श्रमांचे आणि कष्टाचे साफल्य झाल्यासारखे वाटेल.

निवडणुकीच्या आखाड्यात दंड थोपटून विरोधकांना आव्हान द्यायला आता मुळीच कचरू नका. प्राप्तीचे मान फारसे सुधारले नाही तरी अपेक्षित यश अपेक्षेबाहेर पदरी पडेल याची खात्री बाळगा. ता. १५ चा रवि-हर्षल त्रिकोण नव्या

तंत्रमंत्राचा अवलंब करावयास लावील. या महिन्यात अनपेक्षितपणे प्रवास घड-तील, जबाबदाऱ्यांचे ओझे उचलावे लागेल.

दि. ५ ते ९, १३ ते १७, २७ ते ३० घाईगर्दीचे दिवस.

**कर्क** :– या वेळच्या गुरू-शनी त्रिकोण योगात आगळेच सामर्थ्य साठविलेले आहे आणि तृतीयातील मंगळ-हर्षलनी तर या वेळी आपणांस विक्रमी यश मिळवून द्यायचे ठरविलेले दिसते.

ही ग्रहस्थिती लोकोत्तरता, अचाट बुद्धिमत्ता, संशोधनात्मक प्रवृत्ती निर्माण करणारी असते, आपल्या कर्तृत्वाच्या वेगळ्या पैलूंचे जगाला दर्शन घडू लागेल. जुनी चाकोरी बदलून नव्या यशस्वी चाकोरीचा मार्ग शोधून काढला जाईल.

हातून चित्तथरारक लेखन घडेल, व्यवहार-धंद्याचा व्याप व विस्तार वाढेल, राज-कारणाच्या सामन्यात विजयावर विजय संपादन कराल. याच काली आपण आपली बुद्धी आणि शक्ती पणास लावून संघटित व विधायक कार्य करून दाखवाल. तात्पर्य, या वेळी आपण जे जे कराल ते ते अभिनव असेल, अलौकिक असे असेल.

दि. २ ते ८, १३ ते १९, २५ ते २९ अपेक्षासाफल्याचे दिवस.

**सिंह** :– याच महिन्यात मंगळ आपल्या पराक्रमस्थानी प्रकटणार आहे आणि तेथे त्याचा कित्येक दिवस मुक्काम पडणार आहे. ( दि. २२ जानेवारी ते १८ एप्रिल व ४ जुलै ते ३० ऑगस्ट ) या ५–६ महिन्यांच्या कालात या विक्रमी मंगळाच्या साहाय्याने आपण आपल्या अंगीकृत कार्यात अभूतपूर्व यश संपादू शकाल. असा तुळेतील कुजस्तंभ १९५२ नंतर आताच १९६७ मध्ये घडून येत आहे.

आपण आपल्या सिंहगर्जनांनी विरोधकांचे धाबे दणाणून सोडाल, राजकीय क्षेत्रात तर सर्वत्र तुमचाच आवाज उठून दिसेल.

दूरचे दौरे करावे लागतील, सभासंमेलने गाजवावी लागतील. निवडणूक प्रचा-राला खरा रंग चढेल याच काली. कौटुंबिक वातावरणही प्रसन्न बनेल.

दि. ५ ते ९, १४ ते १९, २३ ते २८ सर्वोत्तम यश देणारा काल.

**कन्या** :– या महिन्याची ग्रहस्थिती बरीच आकर्षक व उत्साही दिसेल. मंगळाचे राश्यंतर व सूर्याचे पंचम स्थानी गमन यांमुळे या काली आपल्या अनेक समस्या भराभर सुटाव्यात. आपल्या मनावरील दडपण कमी व्हावे, चित्ताची अशांतता दूर व्हावी.

एकादशस्थ गुरूच्या ठायी असलेले अचाट सामर्थ्य आत्ताच आपल्या प्रत्ययास यावे. दि. १५–१६ जानेवारी हा काल तर आपल्या भावी यशाचा केंद्रबिंदू ठरेल. अनंत अभिनव योजना त्या कालाच्या आसपासच रुजू लागतील.

निवडणुकीचे राजकारण खरे रंगेल याच काली. प्रवास घडेल, अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

दि. २ ते ७, १४ ते १८, २३ ते ३० अत्युत्तम यशदायी काल.

तूळ :– सूर्य-बुध पराक्रमात असेपर्यंतच काही विशेष कार्य करून दाखविण्याची संधी लाभेल. पुढे पहिल्याच पंधरवड्यात ही अनुकूल ग्रहस्थिती तुमच्या वाट्यास आहे. पुढील काल काहीसा कटकटीचा व अडीअडचणींचा जाणवेल.

साहित्य, कला हीच तुमची खास क्षेत्रे. जगाच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतील असे काही भव्य दिव्य कार्य आपल्या हातून घडून यावे. दि. १५ जानेवारीच्या आसपास धनोत्पादनाचे नवे मार्ग दृष्टिक्षेपात यायला लागतील. व्यावसायिक प्रगतीच्या अनेक संधी दार ठोठावू लागतील पण त्या संधीचा त्वरित फायदा उठवायला हवा.

रेंगाळत बसणे, घोळ घालीत बसणे परिणामी इष्ट नसते याची जाणीव या कालात प्रकर्षाने व्हायला लागेल. दुसरा पंधरवडा वैचारिक संघर्ष निर्माण करणारा व प्रकृती अस्वास्थ्य वाढवणारा जाणवेल.

दि. १ ते ६, १३ ते १६, २१ ते २४ विशेष अनुकूल एवढेच.

वृश्चिक :– आधीच आपण कित्येक दिवसांपासून प्रगतिपथावर आहात. त्यातून या महिन्यात रवि-शुक्रादी अनेक ग्रहांची पराक्रस्थानी उपस्थिती घडणार आहे. आता आपणांस दाही दिशा मोकळ्या आहेत. कुठेही जा, काहीही करा. तुमचे सत्कार घडू लागतील, यश अपेक्षेबाहेर पदरी पडू शकेल.

या महिन्यात अनेक दौरे काढावे लागतील, नोकरीधंद्यात तर हेवा करण्यासारखी प्रगती होऊ लागेल. स्थावराचा प्रश्न सुटेल. नोकर-चाकरांची अनुकूलता लाभेल. वाहनांची समस्या निश्चितच सुटेल.

भारतीय निवडणुकीच्या वातावरणात तर सर्वत्र तुमच्याच नावाचा बोलबाला ऐकू येऊ लागेल. प्रज्ञा विकसेल, प्रतिष्ठा उंचावेल, पैसा अपेक्षेबाहेर हाती येऊ लागेल. असे अपेक्षासाफल्याचे क्षण जीवनात क्वचितच येत असतात. त्यांचा अधिकाधिक लाभ उ वलात तर तुमची कायमची ददात मिटेल.

दि. २ ते ६, ११ ते १६, २५ ते ३० अत्युत्तम दिवस म्हणून नोंद केली जाईल.

धनू :–चौथा शनी आणि आठवा गुरू या ग्रहस्थितीतही काही आत्यंतिक प्रगतीच्या घटना असू शकतात. याचा प्रत्यय येथूनच यायला लागेल.

सध्याचे ग्रहमान आपणांस संभ्रमात टाकणारे असले तरी अपयशाचे खासच नाही. या वेळीच तुमच्या भविष्यकालीन यशाचे बीज अंकुरायला लागेल.

स्थावरातील संघर्ष प्रयत्नांनी मिटू लागतील, नोकरी धंद्यातील प्रश्न थोरांच्या सहकार्याने लवकर सुटायला लागेल आणि आज जरी आपण मागे रेंगाळत असला तरी लवकरच आघाडीचे स्थान आपल्यासाठीच राखून ठेवलेले आहे याचा आपणांस प्रत्यय यायला लागेल. १५–१६ जानेवारी हा भविष्यकालीन यशाचा केंद्रबिंदू समजला जाईल.

दि. १ ते ६, १२ ते १८, २३ ते २७ अपेक्षित यश याच वेळी लाभावे.

**मकर**:– आजवर सूर्याचे आपणांस फारसे सहकार्य लाभत नव्हते. या महिन्याच्या मध्यानंतर तीही उणीव दूर होणार आहे.

आता तुमची प्रगती कोणीही रोखू शकणार नाही. एवढेच नव्हे तर रवि-हर्षल त्रिकोणाच्या आसपास (दि. १५ जाने.) अनपेक्षितपणे ध्यानीमनी नसता, कधी नव्हते एवढे अनन्यसाधारण यश पदरी पडेल.

नोकरीधंद्याला उत्थान मिळेल, चारित्र्याला उठाव मिळेल, दूरचे स्थानांतर घडेल, काही व्यक्तींना परदेशी जाण्याचेही भाग्य लाभावे.

रासायनिक, यांत्रिक, विद्युत् क्षेत्रांतील व्यावसायिकांना तर ही एक पर्वणीच वाटेल. खूप पैसा हाती येईल. प्रतिष्ठा तर इतकी उंचावेल की, तुमचा अनेकांना हेवा वाटावा.

दि. २ ते ९, १३ ते १८, २५ ते ३० चिरंतन स्मृतीचा काल.

**कुंभ** :– या महिन्यातील मंगळाच्या भाग्यस्थानातील राश्यंतराने तुमच्या यशस्वी जीवनावर कळस चढेल. पहिल्या पंधरवड्यात र. बु. एकादशात तर दुसऱ्या पंधरवड्यात गुरू-शनीचा त्रिकोण.

तुमच्या आजवरच्या खडतर तपस्येचे श्रेय आता याच महिन्यात पदरी पडणार आहे. नव्या वातावरणात एकदिलाने कार्य करू लागाल. चारित्र्याची उंची वाढव-णाऱ्या अनेक महान घटना या कालीच घडून याव्यात.

जीवनात, आचार विचारात, क्रांती घडवून आणली जाईल. नवे यशस्वी कार्यक्षेत्र हाती गवसेल. प्रगतीच्या अनेक संधी दार ठोठावू लागतील. निवडणुकीचे राजकारण याच काळी रंगू लागेल. प्रतिस्पर्ध्यांच्या छातीत धडकी भरेल. दूरचा प्रवास घडेल. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

दि. ५ ते ९, १३ ते १८, २३ ते २७ अपेक्षासाफल्याचे दिवस.

**मीन** :– मंगळाचे सहकार्य याच महिन्यात मिळण्याची शक्यता कमीच. त्याचे सप्तमांतून अष्टमात राश्यंतर झाले तरी परिस्थितीत फारसा फरक पडणार नाहीच. त्याच अडचणी, त्याच विवंचना तपशिलात थोड्याफार.

गुरु-शनी त्रिकोण योगाचेच काहीसे पाठबळ लाभेल. तो सहसा कशाचीही उणीव भासू देणार नाही.

भागीदारीमध्ये संघर्षात्मक वातावरण निर्माण व्हायला लागेल. कौटुंबिक वाता-वरणही फारसे स्वास्थ्याचे जाणवू शकणार नाही. असे असले तरी तुमच्या प्रतिष्ठे-वर काहीही अनिष्ट परिणाम होऊ शकणार नाही. अगदी स्पष्ट सांगायचे म्हणजे निवडणुकीच्या आखाड्यात आपण उतरू नये हे बरे.

दि. ७ ते १०, १४ ते १८, २५ ते २९ एवढच दिवस काहीसे अनुकूल.

● ● ●



# भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

मूल्य रुपये पंचवीस

राजहंस प्रकाशन
४१९ नारायण, पुणे २

MANOOS (Weekly) । 40 Paise । Regd. No. M H-649

प्रगतिपथावरील पुढचे पाऊल...

स्वस्तिक

चप्पल्स



स्वस्तिक रबर प्रॉडक्टस लिमिटेड, खडकी, पुणें ३.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. **माजगावकर**